**शहराच्या मध्यवर्ती भागात नवीन फ्लॅट्स विकणे आहे**

विष्णुप्रिया हाईट्समध्ये पहिला मजला कमर्शिअल आहे. उर्वरित ४ रेसिडेंसिअल 2BHK फ्लॅट्स प्राईम लोकेशन सह विकणे आहे. (दोन महिन्यात ताबा)
पत्ता : दक्षिण कसबा, आनंद मंगल कार्यालयाजवळ, दाते गणपती मंदिराजवळ
मो. : ९८८१२४५०२७

एकाच १RK फक्त मुली/महिलाकरिता भाड्याने देणे आहे

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

**मंगल कार्यालय**

लग्न, रिसेप्शन, साखरपुडा, मुंज, बारसे, वाढदिवस नव्या स्वरूपात सर्व सोयी सुविधांसह उपलब्ध.

**सौभाग्य मंगल कार्यालय**

आरटीओ जवळ, विजापूर रोड, सोलापूर, मो.: ९०९६९६६२२२

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २१५ वा | बुधवार, दि. ०२ एप्रिल २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# राज्यावर कर्जाचं ओझं, भाजप नेत्यांच्या कारखान्यांना ४३६ कोटी

## शेतकरी कर्जमाफी करण्यास असमर्थतता; आश्वासनं पूर्ण करताना सरकारला धाप

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्य सरकारवरील कर्जाचं ओझं वाढत असल्यानं शेतकरी कर्जमाफी, लाडकी बहीणचा हफ्ता वाढवण्यास महायुती सरकारनं असमर्थतता दर्शवली. विधानसभा निवडणुकीआधी दिलेली आश्वासनं पूर्ण करताना सरकारला धाप लागत असल्याचं चित्र दिसू लागलं आहे. अर्थमंत्री अजित पवार सातत्यानं आर्थिक शिस्तीची भाषा करत आहेत. राज्यावर असलेल्या कर्जाचा उल्लेख करत आहेत. पण अशा परिस्थितीत सरकारनं काही साखर कारखान्यांना कर्ज देण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे हे कारखाने भाजप नेत्यांशी संबंधित आहेत.

सरकारनं नॅशनल कोऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनकडून (एनसीडीसी) ४३६ कोटी रुपयांचं कर्ज घेण्याचं ठरवलं आहे. हे कर्ज दोन सहकारी साखर कारखान्यांना देण्यात येईल. या साखर कारखान्यांचा संबंध भाजप नेत्यांशी आहे. यात जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा समावेश आहे. राज्य सरकारवर आधीच ९.३ लाख कोटी रुपयांचं कर्ज आहे. याच कर्जामुळे लाडक्या बहिणांना महिन्याला २१०० रुपये देणं,



शेतकऱ्यांची कर्जमाफी करणं शक्य नसल्याचं सरकारकडून सांगितलं जात आहे.

एनसीडीसीकडून कर्ज घेत असताना राज्य सरकारला गॅरंटी द्यावी लागते. कर्ज घेण्याचा निर्णय कॅबिनेटच्या उपसमितीनं घेतला आहे. या समितीचे अध्यक्ष सहकार मंत्री बाबासाहेब पाटील आहेत. १८ फेब्रुवारीला झालेल्या एका बैठकीत उपसमितीनं पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याला २९६ कोटी रुपयांचं कर्ज देण्याचा निर्णय घेतला. हा साखर कारखाना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटलांशी संबंधित आहे.

२० मार्चला उपसमितीची आणखी एक बैठक झाली. त्यात मकाई सहकारी साखर कारखान्याला एनसीडीसीकडून १४० कोटी रुपयांचं मार्जिन मनी लोन देण्याचा निर्णय झाला. हा साखर कारखाना सोलापूरच्या करमाळा तालुक्यात आहे. हा कारखाना भाजप नेत्या रश्मी बागल यांच्याशी संबंधित आहे. त्या माजी मंत्री दिगंबर बागल यांच्या कन्या आहेत. दोन्ही कर्ज ८ वर्षांच्या कालावधीसाठी देण्यात आली आहेत. यामध्ये २ वर्षांपर्यंत कोणताही हफ्ता भरावा लागणार नाही. दैनंदिन खर्चासाठी दिल्या जाणाऱ्या खर्चाला मार्जिन मनी लोन म्हटलं जातं.

याशिवाय राज्य सरकारनं शेतकरी सहकारी साखर कारखान्याला जवळपास १८ कोटी रुपयांचं सहाय्य देण्याचा निर्णय घेतला आहे. हा कारखाना लातूरच्या किल्लारी तालुक्यात येतो. तो भाजप आमदार अभिमन्यू पवार यांच्याशी संबंधित आहे. अभिमन्यू पवार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अतिशय निकटवर्तीय मानले जात आहेत. फडणवीसांचे स्वीय सचिव म्हणून त्यांनी काम केलं आहे.

# सोलापूरात अण्णासाहेब पाटील महामंडळाने १२९३८ उद्योजकांची उभारली गुढी

## १०७० कोटी ९८ लाख ४३ हजार ६७९ रुपये कर्ज वाटप

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाकडून सोलापूर जिल्ह्यातील मराठा समाजातील उद्योजकांना उद्योगाकरिता विविध योजना राबवत स्वयंरोजगारातून आत्मनिर्भर बनविण्याकरता वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेतून सोलापूर जिल्ह्यातील १२९३८ उद्योजकांना एकूण बँकेने वितरित केलेले कर्ज रक्कम १०७० कोटी ९८ लाख ४३ हजार ६७९ रुपये इतकी असून आज पर्यंत व्याज परतावा म्हणून अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास मागासमंडळाने १०० कोटी ९२ लाख ११ हजार ६४२ रुपये उद्योजकांच्या खात्यावरती जमा केले आहेत.

६११७ शेतकरी ट्रॅक्टरचे मालक झाले आहेत सोलापूर जिल्ह्यामध्ये सगळ्यात जास्त कर्ज पुरवठा हा ट्रॅक्टर करिता करण्यात आलेला आहे. ट्रॅक्टर, ट्रॉली, नांगर, रोटर, पेरणी यंत्र, खोडकी, फन आधी साहित्य ही खरेदी करण्यात आले आहे. ट्रॅक्टरच्या माध्यमातून आता तरुण वर्ग शेती करत असल्यामुळे शेतीच्या कामाला बऱ्यापैकी गती येईल अशी अपेक्षा अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी बोलताना व्यक्त केली.




कच्च्या मालापासून पक्के उत्पादन सेवा मालवाहतूक व्यापार खाद्यपदार्थ व्यवसाय आणि शेती पूरक व्यवसाय व वाहन खरेदी करिता हा कर्ज पुरवठा करण्यात आला आहे.

आर्थिक दृष्ट्या मागास असलेल्या घटकांना उद्योग व्यवसाय उभारण्याकरता मदत करण्यासाठी अण्णासाहेब पाटील महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे या महामंडळामुळे बेरोजगार युवकांच्या हाताला मोठ्या प्रमाणात काम मिळाले असून सन 2018 सालापासून सुरू झालेल्या या महामंडळाच्या माध्यमातून आजपर्यंत राज्यभरात लाखो उद्योजक तयार झाले आहेत तर मराठा समाजातील युवक युवतींना उद्योगासाठी प्रोत्साहन देण्यास ही महामंडळाने सुरुवात केली आहे.

एलओआय १५०४३ इतक्या उद्योजकांनी केला असो यामध्ये १२९३८ एवढ्या उद्योजकांना बँकांनी कर्ज पुरवठा केला आहे.

या महामंडळाकडून वैयक्तिक गट कर्ज व्याज परतावा योजना गट प्रकल्प योजना राबविल्या जात असून आर्थिक दृष्ट्या मागास असलेल्या घटकापर्यंत विशेष करून बेरोजगार युवकापर्यंत पोहोचून त्यांना सक्षम उद्योजक बनविणे हे काम केले जाते योजना राबवून रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि आर्थिक दृष्ट्या मागास घटकांचा सामाजिक विकास घडवून आणणे हा या योजनांचा उद्देश आहे वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेत कोणत्याही व्यवसायाकरिता कोणत्याही बँकेमार्फत व्यवसायासाठी घेतलेल्या कर्जावरील १५ लाखाच्या मर्यादित व्याज परतावा जास्तीत जास्त १२% च्या मर्यादित अथवा ४.५० लाखाच्या मर्यादित व्याज परतावा करण्यात येतो. दरवर्षी जिल्ह्यामध्ये नवनवीन उद्योजक तयार व्हावे याकरिता आपण प्रयत्न करत असल्याचे अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या कर्मचाऱ्याकडून सांगण्यात आले.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाकडून मराठा समाजातील युवक युवतींना उद्योगासाठी प्रोत्साहित करून महामंडळाकडून त्यांना कर्ज उपलब्ध करून देण्याकरिता बँका तयार करून देण्यात येतात व बँकांनी दिलेल्या कर्जाला व्याज परतावा महामंडळाकडून देण्यात येतो. त्यामुळे मराठा तरुणांनी उद्योग ,व्यवसाय करून स्वतःची प्रगती करावी त्याकरिता आम्ही त्यांना योग्य मार्गदर्शन करू.

**- योगेश वाघ**
जिल्हा समन्वयक
अण्णासाहेब पाटील
महामंडळ, सोलापूर.

# सोलापूर शहरासाठी ९ एप्रिलपासून भीमा नदीतून पाणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** उजनी धरणातून १५ एप्रिलपासून शेतीसाठी दुसरे आवर्तन सोडले जाणार आहे. १५ एप्रिल ते २५ मेपर्यंत हे आवर्तन सुरू राहणार असून त्यासाठी साडेसात टीएमसी पाणी लागणार आहे. दुसरीकडे ९ एप्रिलपासून सोलापूर शहरासाठी भीमा नदीतून पाणी सोडले जाणार आहे. सोलापूर शहराला प्रामुख्याने उजनी धरणातून आणि औज-चिंचपूर बंधाऱ्यातून पाणीपुरवठा



होतो. कडक उन्हामुळे औज बंधाऱ्याने तळ गाठला असून सध्या बंधाऱ्यात १५ दिवस पुरेल इतकेच पाणी शिल्लक आहे. उजनीतून भीमा नदीत सोडलेले पाणी औज बंधाऱ्यापर्यंत पोचायला किमान १० दिवस लागतात, त्यामुळे ८ किंवा ९ एप्रिलपासून धरणातून भीमा नदीत पाणी सोडले जाणार आहे. त्यासाठी साधारणतः सहा टीएमसी पाणी सोडावे लागणार आहे.

१५ एप्रिलपासून शेतीसाठी दुसरे आवर्तन सोडले जाणार असून त्या आवर्तनासाठी साडेसात टीएमसी पाणी सोडावे लागेल. या पार्श्वभूमीवर उजनी धरणातील उपयुक्त पाणीसाठा संपणार असून २० एप्रिल दरम्यान धरण उणे पातळीत जाणार आहे. सध्या शेतीसाठी ६ मार्चला सोडलेले पहिले आवर्तन १४ एप्रिलपर्यंत चालणार आहे. त्यानंतर लगेचच दुसऱ्या आवर्तनाला सुरवात होईल. सध्या सीना-माढा, दहिगाव उपसा सिंचन योजना, कालवा, बोगद्यातून एकूण चार हजार २०० क्युसेकने विसर्ग सोडण्यात आला आहे.

# लोकप्रतिनिधींच्या विरोधात संभाजी ब्रिगेडचे एप्रिल फुल आंदोलन

## सोलापूरला बनवले एप्रिल फुल

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरा चा सर्वांगिक विकास न झाल्यामुळे आणि याला लोकप्रतिनिधी व अधिकारी प्रशासन जबाबदार असल्याचा आरोप करत संभाजी ब्रिगेडच्या वतीने आज सोलापूर शहरातील विविध समस्यांचे फलक हाती घेऊन चार हुतात्मा चौकात निषेध आंदोलन करण्यात आले.



यावेळी लोकप्रतिनिधींच्या नावाने बोंब मारण्यात येऊन लक्ष द्या लक्ष द्या लोकप्रतिनिधींनी सोलापूरच्या विविध प्रश्नावर लक्ष द्या या घोषणा कार्यकर्त्यांनी दिल्या.

गेल्या अनेक वर्षापासून सोलापुरातील लोकप्रतिनिधींच्या अकार्यक्षमतेमुळे सोलापूर शहराच्या म्हणावा तसा चौफेर विकास झाला नाही प्रत्येक लोकप्रतिनिधी आपापल्या मतदारसंघापूरतेच सीमित कामे करतात त्यामुळे सोलापूरचा विकास होण्याऐवजी सोलापूर हे एक भकास खेडेगाव बनत चाललेले आहे असा आरोपी संभाजी ब्रिगेडच्या वतीने करण्यात आला.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले संपर्कप्रमुख शत्रुघन माने शहराध्यक्ष शिरीष जगदाळे कार्याध्यक्ष अरविंद शेळके वकील आघाडीचे जिल्हाध्यक्ष गणेश कदम महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष दास शहराध्यक्ष मोनाली धुमाळ दक्षिण सोलापूर तालुका अध्यक्ष सुनिता घंटे शहर संघटक जयश्री जाधव शहर उपाध्यक्ष मनीषा कोळी दिलीप निंबाळकर उमेश गायकवाड शेखर कंटेकर सतीश वावरे सिद्धाराम सावळे संतोष सुरवसे प्रशांत देशमुख रमेश भंडारे गणेश सोलापुरे.

# प्रशांत कोरटकरला न्यायालयाचा दणका, जामीन अर्ज फेटाळला

**कोल्हापूर (कटूसत्य वृत्त):-** इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत धमकी प्रकरणी आणि छत्रपती शिवरायांची बदनामी केल्याप्रकरणी प्रशांत कोरटकरचा जामीन अर्ज फेटाळण्यात आला आहे. कोल्हापूर जिल्हा सत्र न्यायालयाने हा निर्णय सुनावला आहे. दिवाणी न्यायाधीश एस. एस. तट यांच्यासमोर ही सुनावणी पार पडली. त्यामुळे कोरटकरचा आता कोल्हापुरातील मुक्काम वाढणार आहे.

चौथे सह दिवाणी न्यायाधीश एस. एस. तट यांच्यासमोर सुनावणी पार पडली. यावेळी प्रशांत कोरटकरला व्हिसीद्वारे न्यायालयात हजर करण्यात आले होते. तर त्याचे वकील सौरभ घाग यांनी देखील व्हिसीद्वारे न्यायालयात युक्तिवाद केला. इंद्रजीत सावंतांचे वकील असीम सरोदे यांनीही व्हिसीद्वारे युक्तिवाद केला. तर सरकारी वकील न्यायालयात उपस्थित होते. तिन्ही पक्षांकडून जोरदार युक्तिवाद करण्यात आला. आरोपी प्रशांत कोरटकरचे वकील म्हणाले, '१२ वाजता फोन आला असे फियार्दीचं म्हणणं आहे आणि रात्री ३ वाजता ते फेसबुकवर पोस्ट टाकली होती. १२च्या सुमारास नागपूरमध्ये कोरटकरने जाऊन ही माहिती दिली. या सर्वात ज्यांनी व्हिडिओ



व्हायरल केला त्यांनी पोलिसात जायला हवं होतं, मात्र त्यांनी सोशल मीडियाचा वापर केला. कोरटकर आयफोन वापरतो आणि त्यात कॉल रेकॉर्डिंगचा पर्याय उपलब्ध नाही. त्यांनी पोलिसांना सहकार्यच केलं आहे.

पुढे सरकारी वकिलांनी न्यायालयासमोर जोरदार युक्तिवाद केला आणि प्रशांत कोरटकरच्या जबाबावर अनेक प्रश्न उपस्थित केले. 'हा आरोपी स्वतः पत्रकार आहे अस म्हणतो आणि छत्रपती शिवाजी महाराजांवर डॉक्युमेंट्री तयार केल्याचे सांगतो. मग त्याला काही गोष्टी माहित नाही का? छत्रपती शिवाजी महाराज छत्रपती संभाजी महाराज, जिजाऊ मा साहेब यांचा तो अनादर करतो. आरोपीने इंस्टाग्रामवर देखील इंद्रजीत सावंत यांच्या वक्त्यावर दोन समाजात तेढ निर्माण होईल, असं रिप्लाय लिहिलं आहे. तसेच २ कॉल देखील केले आहेत. मोबाईल हॅक झाल्याचे कोरटकरने सांगितले मात्र आय पी अॅड्रेसद्वारे पोलिसांनी शोध (पान 2 वर..)

# सोलापूर जिल्हयातील खाजगी अकादमीनां आर्थिक सहाय्य

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी व प्रतिभावंत खेळाडू तयार करण्यासाठी शासन सतत प्रयत्नशील आहे. राज्यातील खेळाडूंनी ऑलिम्पिक सारख्या आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पदके संपादित करण्याकरिता नियोजनबध्द प्रयत्न होणे गरजेचे आहे. राज्यातील खेळाडूंसाठी अदयावत क्रीडा प्रशिक्षण यंत्रणा, क्रीडा विषयक पायाभूत सुविधा, क्रीडा वेदकशास्त्र, क्रीडा स्पधार्चे आयोजन, खेळाडूंना पुरस्कार व प्रोत्साहन, खेळाडूंकरिता करिअर मार्गदर्शन व खेळाडूंच्या क्षमता विकासासाठी देशी / विदेशी प्रशिक्षक व संस्थांचा सहयोग हे सर्व घटक विकसित करण्याचा निर्णय घेतलेला आहे. मिशन लक्ष्यवेध या महत्वांकाक्षी योजनेची अंमलबजावणी राज्यामध्ये करण्याचा निर्णय घेतलेला आहे. मिशन लक्ष्यवेध अंतर्गत निवडण्यात आलेल्या अॅथलेटिक्स, आर्चरी, बॅडमिंटन, बॉक्सिंग हॉकी लॉनटेनिस, रॉइंग, शुटींग, सेलींग, टेबल टेनिस, पेटलिटींग, कुस्ती या 12 क्रीडा प्रकाराच्या राज्यातील उत्तम खेळाडू निर्माण करण्या-या खाजगी अकादमीर्ना आर्थिक सहाय्य देऊन अश्या संस्थांचे सक्षमीकरण करण्यात येणार आहे.

मिशन लक्ष्यवेध अंतर्गत खाजगी अकादमींना आर्थिक सहाय्य करावयाच्या दृष्टीने संबधित अकादमी मधील खेळाडू, क्रीडा मार्गदर्शक, सहाय्यक प्रशिक्षक, प्रशिक्षणासाठी उपलब्ध पायाभूत सुविधा व त्यांचा स्तर, क्रीडा साहित्य व क्रीडा अकादमीच्या कामगिरीचे गुणांकन करण्यात येऊन 35 ते 50 गुण प्राप्त करणा-या संस्था क वर्ग, 51 ते 75 गुण प्राप्त करणा-या संस्था व वर्ग व 76 ते 100 गुण प्राप्त करणा-या संस्था अ वर्ग अशा प्रकारे वर्गीकरण करण्यात येणार आहे. क वर्ग अकादमीर्ना वार्षिक रु 10.00 लक्ष, ब वर्ग अकादमींना वार्षिक रु 20.00 लक्ष व अ वर्ग अकादमींना वार्षिक रु 30.00 लक्ष आर्थिक सहाय्य, पायाभूत क्रीडा सुविधा उभारणी, क्रीडा सुविधा उन्नत करणे, प्रशिक्षक मानधन, क्रीडा व प्रशिक्षण उपकरणे इ बाबींवर खर्च करण्यासाठी देण्यात येणार आहे.

त्यानुसार इच्छूक संस्थांनी अधिक माहिती व अजार्चे नमुन्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा व सदर योजनेचा जास्तीत जास्त संस्थांनी लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केलेले आहे.

सायं दैनिक सोलापूर www.katusatya.in **कटूसत्य** katusatya@gmail.com **मुख्य कार्यालय** संपादक पांडूरंग हरिदास सुरवसे उपसंपादक सचिन मोहन जाधव सोलापूर **वृत्तदर्पण** न्यूज चॅनल

पत्ता :- वृंदावन पार्क, होटगी रोड सोलापूर, फोन : ०२१७-२६०५०९१, ०२१७३५५०५९२, मो. ९६५७०६९०६९, मो.९७६५३९०३३९

## आपणही होवू शकता ''मुक्त पत्रकार''

नमस्कार....,

आपणही ''मुक्त पत्रकार'' होवून समाजात मानसन्मान व प्रामाणिकपणे काम करुन प्रामणिक पैसे कमवू शकता. शेतकरी, व्यवसायिक, निमशासकीय कर्मचारी, सुशिक्षित बेरोजगार, डॉक्टर, वकील, इंजिनियर, विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, मुख्याध्यापक, प्राचार्य, ग्रंथपाल, आजी माजी संरपंच, ग्रामपंचायत सदस्य, नगरसेवक यासह समाजाचे हित जोपासणारा कोणताही सुजाण नागरिक ''मुक्त पत्रकार'' होवू शकतो.

या संधीचा लाभ घेण्यासाठी आपण १०००/- रूपये भरून वार्षिक वर्गणीदार (सभासद) होणे आवश्यक आहे. वार्षिक वर्गणी भरणाऱ्यास १०००/- रूपये किंमतीची पुस्तके भेट देऊन वर्षभर अंक घरपोच पाठविला जाणार आहे. तसेच आपली किंवा आपण द्याल ती (२ कॉलम ५ सेंमी) इतकी जाहिरात वर्षातून एकदाच दैनिक ''कटूसत्य'' या वृत्तपत्रात अगदी मोफत प्रसिद्ध केली जाईल.

मग चला तर ९६५७०६९०६९ या मोबाईल क्रमांकावर 'फोन पे', 'गूगल पे' करून, दैनिक सोलापूर कटूसत्य या नावानी चेक/डी.डी.किंवा Daily Solapur Katusatya, Lokmangal Co-Op Bank LTD., Solapur, AC:- 0020011120001265, IFSC:- IBKL0478LOK या खात्यावर आपली रक्कम ऑनलाईनद्वारे जमा करून वर्गणीदार व्हा. आणि ''मुक्त पत्रकार'' होण्याची नामी संधी मिळवा. आपण रक्कम जमा केल्यानंतर तात्काळ ९६५७०६९०६९ या मोबाईल क्रमांकावर कळवा. आणि रक्कम पाठविल्याचा स्क्रीनशॉट, पावती, आपल्या संपूर्ण माहितीसह अर्ज, फोटो, शैक्षणिक पात्रता, भारतीय असल्याचा पुरावा आणि subject मध्ये 'मुक्त पत्रकार' असे लिहून katusatyajob@gmail.com या मेलवर पाठवा. म्हणजे या योजनेच्या सर्व सुविधा आपणास देणे आम्हांला सोपे होईल.

**नियम व अटी:-** १) आपण आपली संपूर्ण माहिती पाठविल्यानंतर दोन दिवसात आपल्या मोबाईलवर डिजिटल मध्ये ''मुक्त पत्रकार'' म्हणून ओळखपत्र पाठविले जाईल. २) ''मुक्त पत्रकार'' मुळ ओळखपत्र व पुस्तके पाठविण्याचा पोस्टल व इतर खर्च २००/- रूपये आपणास द्यावे लागतील. (कार्यालयात येवून हे सर्व साहित्य घेऊन गेल्यास पोस्टल खर्च घेतला जाणार नाही.) ३) सहा महिन्या नंतर ''मुक्त पत्रकार'' म्हणून 'प्रमाणपत्र' दिले जाईल. ४) आपण सर्व प्रकारच्या बातम्या पाठवू शकता. मात्र बातमी लावण्याचे व मानधन देण्याचे सर्व अधिकार दैनिक 'कटूसत्य' व 'वृत्तदर्पण' न्यूज चॅनल कडे राखीव ठेवले जातील. ५) महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही गावातील, शहरातील किंवा महानगरातील व्यक्ती ''मुक्त पत्रकार'' म्हणून काम करू शकतो. ६) आपल्या वृत्तपत्र व न्यूज चॅनलच्या विविध योजणेंसाठी जाहीराती संकलन केल्या जातात. आपण स्वतः संकलन केलेल्या जाहीरतीच्या (जमा केलेल्या) रक्कमेवरच आपल्याला कमिशन दिले जाईल. ७) या योजनेत सहभागी होवून कमिशनच्या स्वरूपात पैसे कमावण्याची संधी आहे. ८) आमचे ''मुक्त पत्रकार'' झाल्यानंतरच आपल्या जाहीराती स्वीकारल्या जातील व आपण पाठविलेल्या जाहिरातीवरच २०% ते ४०% कमिशन दिले जाईल. ९) कोणत्याही जाहिरातची संपूर्ण रक्कम जमा केल्याशिवाय जाहिरात प्रसिद्ध किंवा प्रसारीत केली जाणार नाही. १०) सदर योजनेचे नियम बदलणे किंवा रद्द करणे या बाबतचे सर्व अधिकार दैनिक कटूसत्य व वृत्तदर्पण न्यूज चॅनल कडे राखीव ठेवले आहेत. ११) मग...! चला तर, आजच ''मुक्त पत्रकार'' होवूया..!! आणि कमिशनच्या स्वरूपातून पैसे कमविण्यास सुरूवात करुया...!!!

जे जे चांगले ते ते अंगिकारुया
करी होऊन पणती ! एक सुर्य निर्मूया
अंधार पळवूनी बेकारीचे ! नवे आव्हान पेलूया
हाताला काम, कामाला दाम - चला गाळूया घाम

आपला विश्वासू
सपादक दै.सा.कटूसत्य

टिपः- ''कटूसत्य'' व ''वृत्तदर्पण'' या समुहात आपले स्वागत. आपण आणखीन काहीजणांना आपल्या समुहात सामील कराल अशी अपेक्षा.

## संपादकीय

# नैसर्गिक संकटे मानवनिर्मित?

28 मार्च 2025 रोजी म्यानमार-थायलंडचा 7.7 तीव्रतेचा भयावह भूकंप तेथील जनतेसाठी अंधकारात नेणारा ठरला. यामध्ये शेकडोच्या संख्येने जीवितहानी झाली असून लाखोंच्या संख्येने गंभीर जखमी झाले आहेत, तर अनेकजन अजूनही ढिर्गायामध्ये दबलेले आहेत. हे दृश्य पाहून अंगावर शहारे येतात. बँकॉकमध्ये भूकंप फारच कमी वेळा जाणवतात. मात्र, तुलनेने म्यानमारमध्ये होणाऱ्या भूकंपांचे प्रमाण जास्त आहे. याचे कारण म्हणजे भूकंपप्रवण मानल्या जाणाऱ्या सांगाइंग फॉल्ट लाइनवरच म्यानमार आहे. येथे भूगभातील भूस्तरांचे दोन वेगवेगळे स्तर एकमेकांना जोडले गेले आहेत. इंडिया प्लेट आणि सुंदा प्लेट या नावाने हहे दोन भूस्तर ओळखले जातात. एक मिनिटभरात या भूस्तरांच्या हालचालींमुळे फॉल्ट लाइनवरील 200 किलोमीटरच्या परिसरात भूस्तर 5 मीटरपर्यंत सरकले गेले असल्याचे आढळले आहे, असे ब्रिटिश भूगर्भीय सर्वेक्षणाचे भूकंपशास्त्रज्ञ ब्रायन बॅप्टी म्हणाले. याच ठिकाणी अनेक मोठ्या इमारतींचे बांधकाम सुरू होते. त्यामुळे त्या इमारतींची मोठी पडझड झाली आहे.

म्यानमार-थायलंड किंवा अन्य ठिकाणी भयावह भूकंप किंवा महाप्रलय का येतात? याचे कारण जितके नैसर्गिक आहे त्यापेक्षा अधिक मानवनिर्मित आहे. कारण मानवाने निसर्गावर मोठ्या प्रमाणात अन्याय व अत्याचार केलेला आहे. आज मानवाने स्वतःच्या स्वाथासाठी आकाश-पाताळ-पृथ्वी, चंद्र-सूर्य, पूर्व-पश्चिम, उत्तर-दक्षिण, ग्रह-तारे या सर्वांवर अतिक्रमण करून स्वतःसाठी सुखसुविधा निर्माण केल्या. परंतु या सुखसुविधा विनाशाकडे नेणाऱ्या आहेत आणि त्याचेच प्रायश्चित आज म्यानमार-थायलंडसारख्या जगातील अनेक देशांना भोगावे लागत आहेत. पुढेही जगाला मोठ्या प्रमाणात भोगावे लागण्याचे चिन्ह दिसत आहे. आज मानवाने केलेल्या प्रगतीचा दुरूपयोग होत असल्याने भूकंप, त्सुनामी, महाप्रलय, वणवे, अति उष्णता, अति पाऊस, अति थंडी, ग्लेशियर वितळणे, ज्वालामुखीचा उद्रेक, समुद्राची पातळी वाढणे, भूजलसाठा दिवसेंदिवस कमी होणे या संपूर्ण विनाशकारी उद्धवणाऱ्या घटना मानवाने स्वतःहून ओढवल्या आहेत.कारण वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण व सुखसुविधा याकरिता मोठ्या प्रमाणात जगात जंगलतोड सुरूच आहे.

यामुळे पृथ्वीच्या पोटात ज्या प्रमाणात पाणीसाठा किंवा भूजलसाठा पाहिजे तो साठा अजिबात नसून; जो आहे तोही दिवसेंदिवस कमी-कमी होत आहे. यामुळे जगात मोठ्या प्रमाणात वणव्याच्या घटना, भूकंप, ज्वालामुखीचा उद्रेक वाढताना दिसतात. त्याचप्रमाणे ज्वालामुखीचा उद्रेक याचेही मुख्य कारण जंगलतोड व बदलत्या हवामानामुळे होत आहे. हे भयावह दृश्य आज जरी पृथ्वी चालू उग्र रूप धारण करून महाभयानक होण्याचे संकेत दिसत आहे. या पृथ्वीतलावर मानव बुद्धिजीवी प्राणी आहे. तो वनस्पती, मुक्या प्राण्यांची, संपूर्ण जीवजंतू, पशुपक्षी, निसर्ग व पृथ्वी यांचे रक्षण करू शकतो. परंतु आज मानवाने स्वतःच्या फायद्यासाठी व स्वार्थासाठी संपूर्ण सीमारेषा ओलांडून पृथ्वीवरील संपूर्ण प्राणीमात्रांचा जीव धोक्यात टाकला आहे.

परिणामी म्यानमार-थायलंडमध्ये 7.7 तीव्रतेच्या भूकंपाने हाहाकार निर्माण केला आहे. आज जगातील अनेक देश आगीशी खेळताना दिसतात. यात अमेरिका, रशिया, युक्रेन, इस्रायल, इराण, पोलंड, चीन, उत्तर कोरिया इत्यादीसह अनेक देश एकमेकांवर बंदुका ताणून बसले आहेत. काही देश एकमेकांवर मोठ्या प्रमाणात बॉम्ब वर्षाव करीत आहे. त्यामुळे सर्वत्र आगडोंब उसळल्याचे दिसून येते. हे सर्व वर्चस्वाच्या लढाईसाठी आहे. याकरिता एकमेकांना मोठ्या प्रमाणात विनाशकारी युद्धसामग्रीची देवाणघेवाणसुद्धा करीत आहेत.

यामुळे अनेक देश युद्धाच्या खाईत लोटल्याने तिथे फक्त आगीचे गोळे बरसताना दिसतात. आज जगातील करोडो एकर भूभागांची राखरांगोळी झालेली आहे व अनेक मोठमोठी जंगले अजूनही जळत आहे. जगातील संपूर्ण देश आज सुरूंगाच्या ढिर्गायावर बसले आहे. एवढे नुकसान डोळ्यासमोर होत असूनही रशिया-युक्रेन, इस्रायल-हमाससह अनेक देश एकमेकांना संपविण्याची भाषा करीत आहेत व युद्धसामग्रीच्या शर्यतीत चढाओढ सुरू आहे. म्हणजेच आज जग किती विनाशाकडे जात आहे हे चित्र स्पष्ट दिसून येते. जगातील काही देश गृहयुद्धाने भरडलेले आहेत. पृथ्वीचा व निसर्गाचा विनाश वेळीच रोखला गेला नाही तर धरणीमाता पृथ्वीतलावर असणाऱ्या संपूर्ण जीवसृष्टीला गिळंकृत केल्याशिवाय राहणार नाही हेही तितकेच सत्य आहे. त्यामुळे जगातील नेत्यांनो आतातरी सावधान व्हा व पृथ्वीला वाचवण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करा. अजूनही वेळ गेलेली नाही. मानवाने आपल्या सुखसुविधांसाठी संपूर्ण हद्द पार केल्याचे दिसून येते. या पृथ्वीतलावर लाखो प्रजातीचे प्राणी, पशुपक्षी, जीवजंतू वास्तव करतात. परंतु यात बुद्धिजीवी जात एकच आहे ती म्हणजे मानव. मात्र एकट्या मानव जातीने ही विनाशलीला उभी केली आहे. त्यामुळे जगात दिवसेंदिवस भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे. याला मुख्य कारणीभूत फक्त बुद्धिजीवी प्राणी म्हणजे मानवच आहे. जगात दिवसेंदिवस विनाशलीला वाढतच आहे. तरीही मानवाचा निसर्गावर व पृथ्वीवर होणारा अत्याचार अजूनपर्यंत थांबलेला नाही हे दुर्भाग्य म्हणावे लागेल. मानवाने आपला अतिरेक वेळीच थांबविला नाही तर म्यानमार-थायलंडपेक्षाही भयावह भूकंप किंवा महाप्रलय जगाच्या कानाकोर्पयात केव्हाही, कधीही उद्भवू शकतात हेही नाकारता येत नाही.

म्यानमार-थायलंडमध्ये आलेला भूकंप हा 200 वर्षापूर्वी आलेल्या भूकंपापेक्षाही घातक असल्याचे सांगितले जाते. भारतात गुजरातमधील भूजमध्ये 26 जानेवारी 2001 रोजी 6.9 तीव्रतेचा भूकंप झाला होता. तेव्हा या भूकंपात 20 हजार लोकांचा मृत्यू झाला होता व दीड लाखांपेक्षा जास्त लोक गंभीररीत्या जखमी झाले होते. मोठ्या प्रमाणात वित्तीय हानीसुद्धा झाली होती. वैज्ञानिकांकडून सांगितले जाते की भूकंपाचा केंद्र असलेला म्यानमारमधील मांडाले क्षेत्र संवेदनशीलमध्ये गणल्या जाते. भारतीय आणि यूरेशियन प्लेट यांच्यात टक्कर झाल्याने 28 मार्च रोजी भीषण भूकंप झाला.

ही परिस्थिती पाहता जगातील संपूर्ण देशांनी येणाऱ्या नैसर्गिक संकटांपासून सावध राहण्यासाठी निसर्गाची जोपासना केली पाहिजे. कारण म्यानमार-थायलंडमध्ये झालेल्या अति तीव्रतेच्या भूकंपाने भारतातील अरुणाचल प्रदेश, पश्चिम बंगाल येथेही झटके जाणवले. सोबतच चीन, व्हिएतनाम, तैवान आणि लाओस या ठिकाणी सुद्धा भूकंपाचे झटके जाणवले. म्हणजे नैसर्गिक संकट केव्हा व कुठे येईल हे सांगता येत नाही. आग व पाणी यांच्याशी खेळू नका. कारण, आग केव्हा भस्मसात करेल ते सांगता येत नाही व पाणी केव्हा कुठे वाहून नेईल व डुबवेल हेही सांगता येत नाही. त्यामुळे सावधान! कारण या जखमा कधीच भरून निघू शकत नाहीत. त्यामुळे जगातील देशांनो, पृथ्वीच्या रक्षणासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करा तेव्हाच आपण येणाऱ्या नैसर्गिक महाप्रलयाला थोडा का होईना अंकुश लावू शकू.

# आजारपण न देगा देवा...

उन्हाळा सुरू झाला, की हवामान बदलामुळे अनेक जण आजारी पडले असतील.कमी प्रतिकारक क्षमता, अनुवंशिकता या आपल्या हातात नसलेल्या बाबी खूप वेळा आपल्या आजारपणास कारणीभूत ठरतात. तर बाहेरचे पदार्थ खाणे, सात्विक आहार न घेणं, जागरण, कमी शारीरिक हालचाली इत्यादी आपल्या चुकीच्या जीवनशैलीमुळे देखील काही आजार आपल्याला जडतात. त्याचबरोबर जंतुसंसर्ग, दूषित पाणी, हवा यामुळे देखील आपल्याला आजार पण येतं. अधिकचं तणाव घेणं,मन शांती न लाभणं,ध्यानधारणा, विपश्यना यासारख्या तंत्राचा अवलंब न करणे यामुळे मानसिक आजार पण येऊन पुढे पुढे त्याचं शारीरिक आजारपणात रूपांतर होतं.

चाळिसी पार केल्यानंतर शारीरिक आणि मानसिक उत्साह, शारीरिक क्षमता, ताकद इत्यादीचा आलेख खालच्या दिशेने प्रवास करू लागतो. त्यांना त्याच पातळीवर टिकवून ठेवणं, हेच खरच दिव्य असतं. कौटुंबिक जबाबदाऱ्या, आर्थिक ओढाताण,नोकरी-धंद्याचा ताण या सर्वांना तोंड देत शरीर आणि मनाला सावरावं लागतं.पुढे पन्नाशीनंतर हार्मोन्स बदल आणि शारीरिक ताकदीमध्ये होणारी घट यामुळे येणाऱ्या आजारपणा पुढे शरीर हळूहळू लोटांगण घेऊ लागतं. पूर्वेचे बाल्यावस्थेत असणारे आजार पित्त, वात, शुगर,रक्तदाब यासारखे विकार आता किशोर अवस्थेत येऊन शरीराला त्रास देऊ लागतात. मधुमेह सारखा आजार शरीर हळूहळू पोखरू लागतो.डोळे,हृदय, स्वादुपिंड, पाय, हृदय आणि फुफ्फुसे या सर्वांवर त्याचे परिणाम दिसू लागतात. जे बिघडलं त्याला दुरुस्त करणं एवढेच डॉक्टरांच्या हातात असतं. पुढे साठी नंतर तर हे आजार तारुण्यात पदार्पण करून शरीरावर हुकमत गाजवू लागतात. तारुण्यात असणाऱ्या त्या आजारावर पूर्ण मात करणे आता शक्य नसतं.रोज गोळ्याचा खुराक सुरू होतो. सत्तरी,ऐंशी, नव्वद्दी पार करणं म्हणजे आजच्या काळात शरीरात जडलेल्या आजारपणाशी संसार करणं होय.

एकूणच माणसाचं जीवन आणि आजारपण या दोघांमध्ये आयुष्यभर एक पाठशिवणीचा खेळ सुरू असतो. अनेक संभाव्य आजारांना तोंड देत, चुकवत आपल्याला जगावं लागतं. भगवान गौतम बुद्धांच्या बाबतीत सांगितल्या जाणाऱ्या कल्पित कथेनुसार त्यांना वृद्ध व्यक्ती, आजारी मनुष्य आणि मृत्यू यात्रा दृष्टीस पडल्या होत्या. ज्यामुळे गौतम बुद्धांनी गृहत्याग केला होता. ( डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथात ही कथा पूर्णपणे कल्पित असल्याचे सांगितले आहे.) पुढे त्यांनी दुःखाचा शोध घेण्याचे ठरवले. ही जरी कल्पित कथा असली तरी माणसाचे आजारपण खरंच दुःखदायक असते. घरातील एखादा प्रिय व्यक्ती आजारी पडल्यानंतर एकूणच सर्व घराला अवकळा प्राप्त होते. लहान मुलाचे आजारपण त्याच्या आईवडिलांसाठी कसोटीचा काळ असतं. रात्रभर ते त्याच्या उशापाशी बसून राहतात . त्याची सेवा सुश्रुषा करतात. पुढे त्याचं बरं होणं, पूर्वीसारखं हसणं,खेळणं त्याच्या आई बापाला जगजेत्या सिकंदर प्रमाणं हर्ष उल्हासित करणारा असतं. अंथरुणाला खेळून राहिलेल्या वृद्ध आई बापाची सेवा करणे हे प्रत्येक मुलाचं आद्य कर्तव्य असतं. लहानपणी आई बापाने ज्याप्रमाणे मुलाची सेवा केली आहे; त्या सेवेची उतराई करण्याचा तो काळ असतो. वाघाप्रमाणे आयुष्यभर लढलेला आपला बाप एखाद्या आजारपणामुळे घायाळ होऊन पडलेला पाहणं त्याच्या मुलाला वेदनादायी असतं. आपल्या आईचे आजारपणात होत असणारे हाल, तिचं मुलं जणू स्वतःच सोसत असतं.

'या जन्मी केलेलं पाप याच जन्मात फेडावं लागतं', हे वाक्य आजारी पडलेल्या व्यक्तीला उद्देशून अनेक जण वापरतात. परंतु हे वाक्य तत्त्व शून्य आहे. आजारपण हे माणसाचं संचित दुष्कर्म बघून येत नसतं. आजारपणा मागे सर्वच्या सर्व वैद्यकीय कारण असतात. त्याचा शोध घेण्याचे काम डॉक्टर करतात व औषध उपचार करून आपल्याला बरं करण्याचं दैवी कार्य ते करत असतात. म्हणूनच आधुनिक काळामध्ये आपण डॉक्टरांना 'जीवनदाता' किंवा साक्षात पुनर्जन्म देणारा 'देवच' मानतो. प्रत्येक रुग्ण डॉक्टर पूर्णपणे बरे करू शकत नाहीत, हे वास्तव देखील आपण ध्यानात ठेवलं पाहिजे. आपल्या जवळच्या नातेवाईकांच्या आजारपणात उपचारादरम्यान बरं वाईट काही झालं, तर त्याला डॉक्टरांना पूर्णपणे जबाबदार धरून त्यांच्यावर हल्ला करणं, अशास्त्रीय, अवैज्ञानिक आणि अविवेकी ठरतं. या मागाचा कोणीही भावनिक होऊन अवलंब करू नये. कारण कोणताही डॉक्टर आपल्या मधील ज्ञानाचा, कौशल्याचा आणि प्रयत्नाचा १०० टक्के सहभाग प्रत्येक रुग्णाला बरे करण्यासाठी नोंदवत असतो. शेवटी आजारपण कोणालाही अर्थात आपल्या शत्रूलाही न येऊ,ही प्रार्थना आपण केली पाहिजे.



**किशोर जाधव, सोलापूर**
मो. नं. ९९२२८८२५४१

प्रबोधन

# आत्महत्या : एक चिकित्सा
## झुंज द्या कडवी । घेता का माघार ?

VRS किंवा स्वेच्छानिवृत्ती योजना आजकाल फारच प्रचलित झाल्या आहेत. पण ज्यांचं प्रचलित होणं सामाजिकदृष्ट्या चांगलं नाही, अशा आत्महत्या ह्याही एक प्रकारच्या श्फ्र-अर्थात, स्वेच्छानिवृत्तीच आहेत. नोकरीतील आत्महत्या म्हणजे स्वेच्छानिवृत्ती आणि जीवनातील स्वेच्छानिवृत्ती म्हणजे आत्महत्या! सुटका करून घेणं, हे दोन्ही प्रकारांचं वैशिष्ट्य आहे. त्या स्थितीला वैतागून जाणं, कंटाळ्याची सीमा ओलांडणं, प्रचंड मानसिक कोंडमारा होणं, वैफल्यग्रस्त होणं, निराश होणं, एखाद्या धक्क्यातून न सावरणं, बेफाम मनाला लगाम घालता न येणं, अपेक्षाभंगाचं हृदयविदारक दुःख होणं, मायेच्या सावलीला मुकणं, जीव की प्राण अशा अपत्याचा किंवा पतीचा किंवा पत्नीचा अकाली, दुर्दैवी मृत्यू होणं, ह्या सर्व मानसिक, कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक विपत्तींचा परिपाक म्हणजे आत्महत्या! जगात आजपर्यंत बऱ्याच आत्महत्या इतिहासाने नमूद केल्या आहेत. सॉक्रेटिसने विष पिऊन जीव दिला. सॉक्रेटिसचे अनुयायी त्यांना तुरुंगातून सोडवण्यासाठी प्रयत्नशील होते, पण त्यानी सुटकेला नाकारलं. म्हणजे आत्महत्याच केली. पुराणकथेतल्या प्रभू रामचंद्रांनी सीतेचा विरह असह्य झाल्याने शरयू नदीत जलसमाधी घेतली. पाठोपाठ लक्ष्मणाने आत्महत्या केली. इजिप्तच्या क्लिओपात्राने आत्महत्या केली. मेरेलीन मन्रो, ग्रेटा गार्बो ह्या जगत्सुंदरींनी आत्महत्या केल्या. समाजसुधारक साने गुरुजींनी झोपेच्या गोळ्यांचा ओव्हरडोस घेऊन चिरनिद्रा घेतली. दुसऱ्या महायुद्धात दारुण पराभव झाल्यावर हिटलरनेही आत्महत्याच केली. अमेरिकन कादंबरीकार अर्नेस्ट हेमिंग्वेने स्वतःचीच शिकार केली. त्यांचे चाहते बॅरिस्टर खर्डेकर यांनीही हेमिंग्वेसारखीच आत्महत्या केली. ह्या काही नामवंतांच्या आत्महत्या आहेत. योगीराजांचे समाधी घेणं हीदेखील आत्महत्याच!

आत्महत्या व्यक्तिगत असो, कौटुंबिक असो वा सामुदायिक असो, ते मनोरुग्णाचंच एक लक्षण आहे. मृत्यूचं वेड हा काही माणसांच्या जनुकातील दोषच असतो. तो औषधोपचाराने दुरुस्त होऊ शकतो. समतोल व्यक्तिमत्त्वाची चर्चा मानसशास्त्रात केली जाते. शिक्षणाने समतोल व्यक्तिमत्त्वाची निर्मिती करता आली पाहिजे. बौद्धिक विकासाला शारीरिक विकासाची जोड असली पाहिजे. बौद्धिक आणि शारीरिक विकासाला मानसिक, भावनिक विकासाची जोड असेल, तर मनुष्य आत्महत्येच्या प्रवृत्तीपासून परावृत्त होतो. क्रीडाप्रेमही माणसाचं मन बळकट बनवायला कारणीभूत ठरतं. खेळाचा रोज सराव करणारे लोक आत्महत्या करीत नाहीत. कारण खेळातून अनुभवाला येणाऱ्या 'हार-जीत'मधून मन वास्तववादी बनतं. अशी व्यक्ती एकदम निराश होत नाही. खेळ पराभवुपचवण्याची शक्ती देतात. खेळात देदीप्यमान यश प्राप्त करणारे खेळाडू आपल्या भावना फार संयमितपणे व्यक्त करताना दिसतात. गीतेमधील स्थितप्रज्ञ वृत्तीचा माणूस कधीही आत्महत्या करणार नाही.

आत्महत्या थांबवणं कोणाही व्यक्तीला अथवा प्रशासकीय शक्तीला मात्र शक्य नाही. त्याचसाठी एखाद्या आत्महत्येला असाधारण अपवादाखेरीज कुणी दुसरा जबाबदार आहे, असं म्हणणं, हे बरोबर नाही. कावळा बसायला आणि फांदी मोडायला गाठ पडली, तर फांदी मोडण्याच्याच बेतात होती, हे मान्य केलंच पाहिजे. असाधारण त्रास देणाऱ्या हिटलरच्या छळ छावणीतही टिकाव धरून काही लोक नंतरचं जीवन आरामात-Normal जीवन जगलेत. मरणाऱ्याला मात्र कुणी डोळे वटारल्याचं निमित्तही आत्महत्येसाठी पुरेसं होतं. आत्महत्या करणं हा ज्याचा स्वभाव आहे, त्याला कुणीही वाचवू शकणार नाही. तेथे बिचारी शासनव्यवस्था काय करणार? आत्महत्या करू इच्छिणाऱ्यांनी धीर धरी रे धीरापोटी। असती मोठी फळे गोमटीकिंवा सब्र का फल, मीठा होता है सारखी वचने आणि पुढील अभंग लक्षात ठेवावा,

अभाग्यांनो नका । करू आत्महत्या
कुटुंबाची हत्या। मुळी नको ॥१
सर्व सुखी असा कोणी नाही जगी
जीवन ही सुगी। दुःखाचीच ॥२
लुळ्या-पांगळ्यांचे। दुःख पहा जरा
मनाला आवरा। शिकस्तीने ॥ ३
रोगाशी झुंजती । धन्य रोगी वीर
पहा त्यांना धीर। प्राप्त व्हाया ॥४
झुंज द्या कडवी । घेता का माघार?
सोडी रणक्षेत्र। नामर्द तो ॥५
काळ बदलतो। होतो अनुकूल
सर्वही लाभेल। थोडे सोसा ॥ ६
मरायचे तर । एकट्याने मरा
नका पोरासोरा। विष पाजू ॥७
पिलांना दुंबळे। पक्षी भरविती
हे का न पाहती। आई-बाप? ॥८
मरणाचे प्रेम। विकृती वेड्यांची
वृत्ती जगण्याची। शूरा लाभे ॥९



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# बेकायदेशीर अवैध दारू धंदे बंद करा राज्य उत्पादन शुल्क कार्यालयावर उबाठाची निदर्शने



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सैफुल ते सोरेगाव सर्व्हिस रोडवर बेकायदेशीर दारू धंद्यांचा ऊत आला आहे. आयटीआय पोलीस चौकी जवळ असलेल्या चहा कॅन्टीन, चायनीज गाड्या, अंडा आम्लेट गाड्या व पान टपरींवर बिनधास्त दारूची विक्री चालू आहे. या व्यवसायांना राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांचा वरदस्त आहे. हप्ते घेऊन हे सदरचे व्यवसाय चालवले जात असल्याने उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेचे जिल्हाप्रमुख संतोष पाटील यांचे नेतृत्वाखाली सोमवार 1 एप्रिल रोजी निदर्शने करण्यात आली.

रोज सायंकाळी दुपारी रात्री उशिरापर्यंत या भागात दारुड्यांचा बाजार भरतो. या भागातील नागरिकांना चालणे चालत जाणे मुश्किल झाले आहे. या भागात शिक्षण देणारी आयटीआय सारखी शिक्षण संकुल आहे.इथे येणाऱ्या विद्यार्थ्यांना या अवैध धंद्यांचा मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. जवळच असलेल्या मंदिरासाठी चालत जाणाऱ्या महिलांना दारुड्यांच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे वेळप्रसंगी छेडछाडीचे प्रकार घडत आहेत अनुचित प्रकार घडण्याची शक्यता आहे. उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेच्या वतीने यापूर्वी निवेदन देऊन इशारा दिला होता तरी देखील राज्य उत्पादन शुल्कच्या अधिकाऱ्यांना जाग आली नाही त्यामुळे आंदोलन करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले

राजू उत्पादन शुल्क विभागाचा अधिकार असो. हप्ते घ्या अवैद्य धंदे चालू ठेवा, पाच हजार रुपये द्या ओपन परमिट रूम चालवा सात हजार रुपये द्या ओपन दारू धंदा चालवा, शिवसेना बाळासाहेब ठाकरे गटाचा विजय असो असा घोषणा देत परिसर दणाणून सोडला होता

या आंदोलनात शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष पाटील, उपजिल्हाप्रमुख खंडू सलगरकर, उपशहर प्रमुख शिवा माळी, परमेश्वर देवकते, प्रशांत बिराजदार, रवी घंटे, सखाराम वाघ, संगप्पा कोरे, परमेश्वर देवकते, विनोद जाधव, कुमार शिंदे राकेश मालकोटे, विकास डोलारे आधी शिवसैनिक सहभागी झाले होते

# पिकांची तहान भागविण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड



| उजनी धरणातील शिल्लक पाणीसाठा | दृष्टीक्षेपात |
|---|---|
| शिल्लक पाणीसाठा | २५ टक्के |
| मृत पाणीसाठा | ६४ टीएमसी |
| उपयुक्त पाणीसाठा | १३ टीएमसी |
| सोलापूरसाठी आवर्तन | २ हजार ९५० क्यूसेक |

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील शेती सिंचनाबरोबर इतर पाणी योजनांसाठी आवर्तन सुरु असल्याने उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील पाणी पातळी झपाट्याने कमी होत आहे. वाढत्या उष्णतेमुळे पिकांची वाढलेली तहान भागविण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड सुरु आहे. पाणी पातळी दुरावत असल्याने विद्युत पंप हलविणे, पाइप व केबल वाढविण्याचे वाढीव काम शेतकऱ्यांना करावे लागत आहे.

सध्या उजनी धरणातील पाणीसाठा २५ टक्क्यांवर पोचला आहे. यामध्ये मृत पाणीसाठ्यातील ६४ टीएमसी साठा वगळता उपयुक्त पाणीसाठा केवळ १३ टीएमसी आहे. यातच गाळाचे प्रमाण ५ टीएमसीहून अधिक असल्याचा अंदाज वर्तविला जातो. तर याच पाण्यातून सोलापूर जिल्ह्यातील सिंचनासाठी मुख्य कालव्यातून २ हजार ९५० क्युसेक्सने पाणी सोडण्यात आले आहे. याशिवाय बोगदा, सीना- माढा योजना, दहिगाव योजनेसाठी पाणी सोडणे सुरु आहे. येत्या आठ- दहा दिवसांत सोलापूर शहराच्या पिण्याच्या पाण्यासाठी नदीतून पाणी सोडले जाईल. त्यामुळे उजनी धरण या महिनाअखेरपर्यंत मृत साठ्यात प्रवेश करेल, असा अंदाज वर्तविला जात आहे.

आगामी उन्हाळ्यातील दोन महिने व पावसाळ्यात धरणात पाणीसाठा येईपर्यंतचे दोन महिने असे चार महिने पाणी पुरेल, याबाबत कोणतेच नियोजन नसल्याचा आरोप धरणग्रस्त शेतकरी करत आहेत. ज्यांनी धरणासाठी त्याग केला, त्यांनाच पाण्यापासून वंचित ठेवले जात असल्याची खंत धरणग्रस्तांमधून व्यक्त होत आहे. एकीकडे पिकांना पाणी देण्यासाठी सुरु असलेली शेतकऱ्यांची कसरत व दुसरीकडे सतत खंडित होणारा वीज पुरवठा शेतकऱ्यांसाठी 'दुष्काळात तेरावा महिना' याप्रमाणे ठरत आहे. त्यामुळे केवळ धरणाच्या जिवावर अवलंबून असलेल्या धरणग्रस्त शेतकऱ्यांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

सोलापूरप्रमाणे पुणे जिल्ह्यातील अनेक पाणी योजना उजनीवर अवलंबून असल्याच्या बाबीकडे दुर्लक्ष होत आहे. उजनीतून बेकायदेशीरपणे नदीत पाणी सोडले जाते. पालकमंत्री, जलसंपदा मंत्री याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत. धरणग्रस्तांची एकजूट नसल्याची बाब सोलापूरकरांच्या पथ्यावर पडत आहे. मात्र, उजनीसाठी जमिनी दिलेल्या शेतकऱ्यांचा प्रपंच धरणाच्या पाणलोट क्षेत्रावर अवलंबून आहे. ही बाब विचारात घेऊन उजनीतील मृतसाठ्यातील पाण्याला हात न लावता केवळ उपयुक्त साठ्यातील पाण्याचे वाटप करण्याचे नियोजन कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत होणे गरजेचे आहे. उजनीच्या मूळ आराखड्यानुसार धरणग्रस्तांच्या वाटणीचे पाणी राखीव ठेवावे. गेल्या काही वर्षांपासून उन्हाळ्यात धरणग्रस्तांना यामुळे टंचाईचा सामना करावा लागत आहे.

# पंढरपूर नगर परिषदेचे हॉस्पिटल पुन्हा नागरिकांच्या सेवेत

## आमदार अभिजित पाटील यांच्या हस्ते गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर शुभारंभ



**पंढरपूर (कटुसत्य वृत्त):-** अनेक वर्षापासून बंद अवस्थेत असलेले पंढरपूर नगरपरिषदेचे हॉस्पिटल पुन्हा नागरिकांच्या सेवेसाठी सुरू करण्यात आले आहे. या हॉस्पिटलचा शुभारंभ पाडव्याच्या मुहूर्तावर आमदार अभिजित पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी माजी नगराध्यक्ष सुभाष भोसले, रा. पा. कटेकर, किरण घाडगे, विक्रम शिरसट, नागेश जाधव यांच्यासह आरोग्य विभागाचे डॉक्टर, कर्मचारी उपस्थित होते.

१०० वर्षाची परंपरा असलेल्या पंढरपूर नगरपरिषदेचे हॉस्पिटल अनेक वर्षापासून बंद अवस्थेत होते. आमदार अभिजित पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच पार पडलेल्या आमसभेत पंढरपूर शहरातील नागरिकांनी नगरपरिषदेचे यांच्या माध्यमातून त्याचा पाठपुरावा हॉस्पिटल बंद असल्याची तक्रार करण्यात आला. नगरपरिषदेचे केल्याने आमदार अभिजित पाटील हॉस्पिटल गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर सुरू करण्यात आले. सामान्य नागरिकांच्या सेवेसाठी हॉस्पिटल सुरू झाल्याने पंढरपूर शहर व परिसरात आनंदाचे वातावरण झाले आहे. यातूनच हजारो गरजू रुग्णांना माफक दरात आरोग्यसेवा मिळणार आहे.

पान १ वरून

# प्रशांत कोरटकरला न्यायालयाचा दणका...

घेतला, त्यानंतर फोन कोरटकरने केल्याचे सिद्ध होत आहे. त्यामुळे आरोपी खोट बोलत आहेत हे सिद्ध आहे. पत्रकार असून तो असा वागतो. आरोपीला जामीन मंजूर झाल्यावर तो पळून गेला तर? हा आरोपी बेलवर बाहेर आला तर तो ज्यांनी नाव घेतली आहे, त्यांना भेटू शकतो आणि त्यांना पोलिसांकडे चौकशीला नजाण्यासाठी दबाव आणू शकतो,' असा युक्तिवाद त्यांनी केलौ.

तर इंद्रजीत सावंत यांच्या पक्षाकडून असीम सरोदे यांनी युक्तिवाद केला. 'हे संभाषण ऐकलं तर छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज आणि जिजाऊ आई साहेब यांच्याबद्दल प्रचंड वाईट बोलले आहेत. मराठा समाजाबद्दल अत्यंत वाईट बोलल आहे. दोन समाजात तेढ निर्माण करण्याच्या मानसिकतेतून त्याने हे वक्तव्य केलं आहे. छावा चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर इंद्रजीत सावंत यांनी माध्यमांना इंटरव्ह्यू दिले आणि त्यातील काही मुद्दे आवडले नाही, असे आरोपी म्हणत आहे. मात्र त्यातील कोणते मुद्दे खटकले हे आरोपी सांगू शकत नाही. कागदपत्रावर कोरटकर चे अनेक सह्या आहेत. त्यातील अनेक सह्या वेगवेगळ्या आहेत. यामुळे आरोपीला जामीन देऊ नये अस आमचं मत आहे.' असा युक्तिवाद सरोदेंनी केला.

## वात्रटिका

### घिबली की जिबली

घिबली की जिबली
पण याड लावलं तिनं...
चॅट जीपीटी वापरून
फोटो काढले ज्यानं त्यानं...
कोणी असं आहे कोणी तसं
उभं राहिले कोणी पोज देऊन...
कहर केला कोणी कोणी तर
उभं राहिले कोणी मिठीत घेऊन...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# शैक्षणिक नवसंशोधनात नवले दाम्पत्याचा राज्यस्तरीय सन्मान



**अंकोली (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण, पुणे यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत नवले दाम्पत्याने उल्लेखनीय यश मिळवत आपला नावलौकिक वाढवला आहे.

या स्पर्धेत तालुकास्तरावर इयत्ता पहिली-दुसरी गटातून सौ. निर्मला केदारलिंगे-नवले यांनी प्रथम क्रमांक पटकावला, तर तिसरी ते पाचवी गटातील गणित विषयासाठी चंद्रकांत नवले यांनी द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले.

या विजेत्यांचा सत्कार व बक्षीस वितरण समारंभ नुकताच संपन्न झाला. यावेळी जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वेळापूरचे प्राचार्य जितेंद्र साळुंखे, अधिव्याख्याता शशिकांत शिंदे आणि शिक्षण विस्तार अधिकारी बापूसाहेब जमादार यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

नवले दाम्पत्याच्या या उल्लेखनीय यशाबद्दल मोहोळ पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी अविचल महाडिक, मल्लिनाथ स्वामी, केंद्रप्रमुख राजकुमार राऊत, सिद्धेश्वर कलबुर्गी, विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व शाळा व्यवस्थापन समिती यांनी अभिनंदन केले.

# अनिल सावंत यांच्या मंगळवेढ्यातील जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन



**मंगळवेढा : (कटुसत्य वृत्त):-** गुढीपाडवा व नव्या मराठी वर्षाचे साधून मंगळवेढा शहरात भैरवनाथ शुगर्सचे व्हा. चेअरमन, मतदारसंघाचे राष्ट्रवादीचे उमेदवार अनिल सावंत यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी ढोबळे म्हणाले की, भविष्यात या तालुक्यात शेतकरी, सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या प्रश्नांसाठी संघर्ष करावा लागेल. संघर्षाचे राजकारण करण्यासाठी प्रसंगी दामाजीपंतांसारखे अधिकाऱ्यांना हात जोडून सर्वसामान्य, गोरगरीब जनतेचे प्रश्न सोडवा, अशी विनंती करू, असे म्हणाले.

काँग्रेस कार्याध्यक्ष नंदकुमार पवार म्हणाले की, दर सोमवारी आपल्या कार्यालयात जनतेच्या अडीअडचणी संदर्भातील अर्ज घेऊन ते सामुदायिकरित्या शासकीय कार्यालयात गेले तर जनतेचे प्रश्न सुटू शकतील. राष्ट्रवादीचे राहुल शहा म्हणाले की, शरद पवार यांना मानणारे

तालुक्यामध्ये विधानसभा निवडणुकीनंतर सातत्याने जनतेच्या संपर्कात राहण्याचे काम अनिल सावंत यांनी केले. अनिल सावंत म्हणाले की, राज्यात सत्ता नसली तरी महाविकास

आघाडीच्या माध्यमातून जनतेच्या प्रश्नाला न्याय देण्यासाठी आम्ही प्रयत्न करू. मंगळवेढा तालुक्यातील नागरिकांनी आपल्या अडीअडचणी सोडवण्याच्या दृष्टीने त्यांच्यासाठी जनसंपर्क कार्यालय सुरू केले आहे. त्यासाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली असून मतदारांनी जनतेने आपल्या अडीअडचणी लेख स्वरुपात द्याव्यात. जेणेकरून त्या सोडवण्यासाठी प्रयत्न करता येईल.

यावेळी चंद्रशेखर कोंडूभैरी, प्रा. येताळ भगत, राहुल घुले यांची भाषणे झाली. यावेळी मतदारसंघ अध्यक्ष संतोष रंदवे, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष प्रथमेश पाटील, दत्तात्रय भोसले, नारायण गोवे, साहेबराव पवार, जमीर इनामदार, स्मिता अवघडे, नितीन पाटील, गुलाब थोरबोले, अजय अदाटे, बळवंत पाटील, पंकज चव्हाण, काशीनाथ सावंजी आदींसह महाविकास आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते..

# आदिनाथच्या भल्याचा निर्णय घेणे आता सभासदांच्या हाती - विवेक येवले



**करमाळा, (कटूसत्य वृत्त):-** आदिनाथच्या निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय बागल गटाने दोन दिवसांपूर्वी जाहीर केल्यानंतर ज्येष्ठ नेते, माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी देखील या निवडणुकीपासून दूर राहण्याचा निर्णय घेतल्यामुळे आता सभासदांसमोर राहिलेल्या पयार्यामधून आदिनाथच्या भल्यासाठी निर्णय घेणे अधिक सोयीस्कर झाले असल्याची प्रतिक्रिया ज्येष्ठ पत्रकार, मकाईचे माजी संचालक विवेक येवले यांनी व्यक्त केली आहे.

याविषयी बोलताना येवले म्हणाले की, २०१७ च्या निवडणुकीत चार गटांच्या लढतीत कुणाला सत्ता मिळाली आणि पुढं काय घडलं हे सर्वश्रुत असल्याने ते उगाळण्याची आता गरज नाही. २२ नोव्हेंबर १९९३ ला आदिनाथ सुरू झाल्यापासून ते काल अखेर या कारखान्यावर सर्वाधिक काळ कुणाचं वर्चस्व होतं, १९९९ साली कर्जमुक्त झालेला आदिनाथ पुढे कुणाच्या मनमानी, घराणेशाहीच्या करणीमुळे गर्तेत आला, आ.रोहित पवारांना हा कारखाना भाडेतत्वावर चालवायला द्यायचा ठराव कोणी केला आणि त्यात पुन्हा कोणी कोणी खोडा घातला, तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या हस्ते गळीत हंगाम सुरू करून केवळ ड्रामेबाजी करून, पुन्हा त्यावर प्रशासक आणून आदिनाथची वासलात कुणी लावली हे सगळं ऊस-उत्पादक, सभासद

मतदारांना पूर्णतः ठाऊक आहे. या पूर्ण कालावधीमध्ये जयवंतराव जगताप यांच्या नेतृत्वाखाली २००१ ते २००६ या दरम्यान फक्त पाच वर्षे पूर्ण सत्ता होती. पण सुरुवातीची चार वर्षे त्यांनी त्यांच्या समवेत असलेल्या गोविंदबापू पाटील नंतर मा.आ. रावसाहेब पाटील यांना चेअरमनपदी संधी देऊन त्यांचे हाती कारभार सोपविला होता. त्यानंतर दि.५ मे २००५ रोजी स्वतः जयवंतराव चेअरमन झाल्यानंतर त्यांनी २००५-०६ च्या हंगामामध्ये उसाला सर्वाधिक भाव दिला आणि ऑक्टोबर २००६ च्या निवडणुकीत सहानुभूतीच्या लाटेत आदिनाथवर पुन्हा एकहाती बागल गटाची सत्ता आली आणि त्यानंतरचा आदिनाथचा आजअखेरचा इतिहास हा जगजाहीर आहे.

त्यामुळं आता होत असलेल्या निवडणुकीत रिंगणात राहिलेल्या नेते व उमेदवारांपैकी कुणाच्या पाट्या कोऱ्या आहेत, कोणत्या नेत्याकडे आदिनाथची गाडी पुन्हा रुळावर आणण्याची क्षमता आहे, कोणता नेता शासनाकडून आदिनाथसाठी निधी मिळवू शकतो हे सभासदांना नक्कीच ठाऊक असल्याने आतातरी सभासदांनी गटबाजीच्या राजकारणात न अडकता केवळ आदिनाथच्या भल्यासाठी योग्य निर्णय घ्यावा, असे आवाहन यावेळी बोलताना येवले यांनी केले आहे.

# गुन्हेगार होणार पोलीसांच्या सहकार्याने होणार शासकीय योजनेचे लाभार्थी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांनी गुन्हेगारांना गुन्हेगारीच्या दलदलीतून बाहेर पडण्यासाठी " पहाट " हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमांतर्गत सोलापूर जिल्हयातील पोलीस अधीक्षक ते पोलीस उपनिरीक्षक या दर्जाच्या पोलीस अधिकारी यांना वारंवार गुन्हे करणारे आरोपींना दत्तक दिले आहे. सदर आरोपींच्या हालचालीवर पालक आरोपी हे लक्ष ठेवून असून ते त्यांच्याशी नियमीत संपर्कात आहेत. त्यांच्यावर दाखल केसेस, त्यांचे कुटूंबीय यांची देखील माहिती घेतली आहे. तसेच त्यांना गुन्हेगारीपासून बाहेर येण्यासाठी मदत करत आहेत. यामध्ये प्रामुख्याने त्यांना उदरनिवार्हाचे साधन उपलब्ध करून देण्यावर सुरूवातीस भर देण्यात येत आहे. यासाठी दिनांक ०१.०४.२०२५ रोजी पोलीस मुख्यालय, सोलापूर ग्रामीण येथे शासनाकडून अनुसुचीत जाती व जमातीमधील गुन्हेगार तसेच शेती असणारे गुन्हेगारांना बोलावण्यात आले होते.

तसेच शासनाकडील समाज कल्याण विभाग, कृषी अधिकारी, आदिवासी विकास प्रल्कप यांचे अधिकारी हजर होते. या विभागाकडून विविध योजनांची माहिती त्यांना देवून हजर असलेल्या गुन्हेगारांमधून पात्र उमेदवारांचे आवश्यक कागदपत्र व विहीत नमुन्यातील फॉर्म जागीच भरून घेण्यात आले आहेत. यामुळे लवकरच अशा गुन्हेगारांना या योजनांचा शासकीय नियमानुसार लाभ दिला जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने रिक्षा खरेदी, दुकान, सायकल, पिठाची गिरणी, तिकट काडंप मशिन या मिळणार आहेत. यामुळे गुन्हेगारांना त्यांच्या रोजच्या गरजा पूर्ण होण्यासाठी चलन उपलब्ध होणार आहे. तसेच ज्यांच्या नावे शेती असून ७/१२ उतारा आहे त्यांना कृषी विभागाकडील योजनांचा लाभ मिळणार आहे. सदर मेळाव्यास डॉ. भोगे, मानसोपचार तज्ञ, श्रीमती शैलजा क्यातम, सहायक सरकारी वकील गणेश चादरे, सामाजीक कार्यकर्ते यांनी मार्गदर्शन केले असून गुन्हेगारी तसेच वाईट व्यसनांपासून दूर राहण्याबाबत उपचार पध्दती, जिवन पध्दती याबाबत मार्गदर्शन केले आहे.

सदर मेळाव्यास अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस ठाणेकडील नोडल अधिकारी व पोलीस अधीक्षक कायार्लायतील पोलीस निरीक्षक अतुल मोहीते, सहायक पोलीस विशाल वायकर, पोलीस उपनिरीक्षक सुबोध जमदाडे हे उपस्थित होते.

# सहकार महर्षी कारखाना सेवक पतसंस्थेची निवडणूक बिनविरोध

**अकलूज (कटुसत्य वृत्त):-** सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना सेवकांच्या सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी युवराज इनामद यांची तर व्हॉइस चेअरमनपदी पांडुरंग इनामदार यांची निवड करण्यात आ आहे. सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित शंकरनगर अकलूज या संस्थेची २०२५ ते २०३० या कालावधीसाठीची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध पार पडली. कारखान्याचे मार्गदर्शक संचालक व राज्याचे माजी उपमुख्य विजयसिंह मोहिते-पाटील तसेच चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील व संचालिका स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असणाऱ्या या पतसंस्थेने कामगारांच्या हितासाठी विविध निर्णय घेत नेहमी कामगार हित जोपासले आहे. त्यांच्याच मार्गदर्शनाने ही निवड बिनविरोध पडली. सचिवपदी अभिजित माने-देशमुख, खजिनदार म्हणून केशव मो तर संचालक म्हणून गणेश लोकरे, अशोक डोके, बाळासाहेब किर्दकर, गुलाब देशमुख, संतोष नाशिककर, कल्याण जाधव, नामदेव सावंत, संद खंडागळे, नागेश झपके यांची बिनविरोध निवड झाली आहे. तर मॅनेजर म्हणून नागेश राजमाने हे काम पाहत आहेत. या निवडीबद्दल सर्व नूतन संचालकांचे कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील, संचालिका कु. स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांनी सत्कार केला..




## जाहीर नोटीस

दि.कि. अर्ज नं. ५९/२०२५

**सोलापूर येथील मे.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर सो,(मा. ए. एस.बिराजदार साहेब) यांचे न्यायालयात**

१)श्रीमती मुक्ताबाई सुभाष पाचंगे वय: ५६ वर्षे,धंदा: घरकाम.२)श्री.महेश सुभाष पाचंगे वय: ३९ वर्षे,धंदा: मजुरी दोघेही रा. मरिआई मंदिराजवळ,२१७,गरीबी हटाव झोपडपट्टी क.१,विजापूर नाका,सोलापूर ४१३००४.३)सौ.कविता वसंत उगाडे वय: ४२ वर्षे,धंदा घरकाम.४)सौ.रागिणी कुमार उगाडे वय: ३२ वर्षे,धंदा घरकाम दोघेही रा. प्यासा हॉटेल जवळ, पटारे वस्ती,कांदवक वस्ती,पुणे ४१२२०१. ५)सौ.रोहिणी शामराव वाघमोडे वय: ३७ वर्षे,धंदा घरकाम रा.म्हसोबा मंदिराजवळ, म्हसोबा कॉलनी,गोपाल पट्टी, मांजरी बु.,पुणे ४१२३०७ ६)सौ.मोहिनी संदिप उगाडे वय: ३४ वर्षे,धंदा घरकाम रा.कदम वस्ती,लोणी काळभोर,पुणे ४१२२०१ } **अर्जदार**

**विरूध्द**

कोणी नाही } **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार नं.१ यांने पती व अर्जदार नं. २ ते ६ यांचे पिता स्व. सुभाष अमोगसिध्द पांचगे यांचे शहर सोलापूर येथे दि. ११/०९/२०२३ रोजी निधन झालेले असुन सदर अर्जदार यांनी स्व. सुभाष अमोगसिध्द पांचगे यांचे लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेसाठी मे कोर्टात अर्ज केलेला आहे. सदर स्व. सुभाष अमोगसिध्द पांचगे यांचे अर्जदार यांचेशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नव्हते व नाहीत.

१ अ. डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दवाढ भागातील मौजे सोरेगांव येथील जमीन गट नं. ५/२ याचे एकूण क्षेत्र ०० हेक्टर ९६.०० आर यातील शितल नगर भाग-२ या नावाने ओळखल्या जाणा-या वसाहतीमधील प्लॉट नं. ४९ याचे क्षेत्र १०६४. २४ चौ.फूट यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे:-पूर्वेस-प्लॉट नं. ५८,पश्चिमेस-प्लॉट नं. ६०,दक्षिणेस-रस्ता,उत्तरेस-सुरवसे यांची जमीन.

येणेप्रमाणे चतुः सिमेमध्ये वर्णन केलेली खुली जागा त्यातील दगड,माती वगैरे तदंगभूत वस्तुसह व इजमेंट हक्कासहची मिळकत.

ब.डिव सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दीतील विजापूर नाका येथील गरीबी हटाव झोपडपट्टी नं.१ मधील घर नं. १७९ असे आहे.

येणेप्रमाणे चतुः सिमेमध्ये वर्णन केलेली खुली जागा त्यातील दगड,माती वगैरे तदंगभूत वस्तुसह व इजमेंट हक्कासहची मिळकत.

त्याअर्थी सदर अर्जदार यांना स्व. सुभाष अमोगसिध्द पांचगे यांचे वारस असल्याचे लिगल हेअरशिप सर्टिफिकेट अर्जदार यांना देणेबाबत कोणाचेही काही हरकत व तकार असल्यास सदर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसात किंवा नेमलेली तारीख ०९/०६/ २०२५ रोजी मे. कोर्टात हजर राहून लेखी हरकत घ्यावी, अन्यथा पुढील आदेश पारीत करुन अर्जदार यांचे नावे वारसा दाखल दिला जाईल याची नोंद घ्यावी.ही जाहीर नोटीस दिली ता. ०१/०४/२०२५

लिपीक (शिक्का) **हुकुमावरुन सहा.अधिक्षक दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तरसो. सोलापूर**



## Classified - छोटी जाहीरात

### विकणे आहे

- **सोलापूर - अक्कलकोट रोड टच कोन्हाळी येथे 5 एकर जमीन विकणे आहे**
- **सोलापूर - पुणे हायवे रोड टच वडाची वाडी येथे साडे सहा एकर जमीन विकणे आहे**
- **सोलापूर - तुळजापूर रोड टच उळे येथे 33 गुंठे जमीन विकणे आहे**
- **गुळवंची - कोंडी रोड टच प्रति गुंठा 1 लाख प्रमाणे 11-11 गुंठे जमीन विकणे आहे.**
- **सोलापूर सिटीत संभाजी चौक ते रेल्वे ट्रॅक रोड टच प्लॉट विकणे आहे**

**मो. 9860848471/ 7741077411**


# नेहरु युवा केंद्रात सेवापूर्ती सोहळा संपन्न



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नेहरु युवा केंद्र धाराशिव कार्यालय जिल्हा युवा अधिकारी तथा महाराष्ट्र उपसंचालक धनंजय काळे व नेहरू युवा केंद्र धाराशिव चे लेखाधिकारी विकास कुलकर्णी यांचा सेवापूर्ती निमित्त सपत्नीक सत्कार सोहळा धाराशिव च्या कार्यालयात संपन्न झाला. या सेवापूर्ती कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून वाशी नगर पंचायत चे नगराध्यक्ष सुरेश बप्पा कवडे, सोलापूर नेहरु युवा केंद्र जिल्हा युवा अधिकारी अजित कुमार, मराठवाडा सिनेट सदस्य देवीदास पाठक तसेच जिल्ह्यातील आजी माजी स्वयंसेवक, पत्रकार बांधव, सामाजिक संस्थेचे सदस्य, बचत गट राजकीय महिला पुरुष पदाधिकाऱ्यांसह नेहरु युवा केंद्रातील मंडळाचे सदस्य आदी उपस्थित होते.

या सेवापूर्ती सोहळ्यात, मराठवाडा सिनेट सदस्य देवीदास पाठक, सोलापूर जिल्हा युवा अधिकारी अजित कुमार, स्वयंसेवक रुपेश उमरदंड, प्रदीप साठे, पुरुषोत्तम बेले, रामेश्वर चोबे ज्ञानेश्वर भोसले, मंगेश पगारे सौ.मीनाताई सोमाजी, सौ.नंदाताई पूनगुडे, आदिनी आपले मनोगत व्यक्त केले तर कार्यक्रम यशस्वीतेसाठी रविकांत सुरवसे, वैभव लांडगे, श्याम वाघमारे, प्रशांत मते यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप साठे यांनी केले तर आभार पुरुषोत्तम बेले यांनी मानले.

# लाखाहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये 'बाईक टॅक्सी' धावणार

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** राज्यात नागरिकांना नाविन्यपूर्ण परिवहन सेवेच्या सुविधा देण्यासाठी राज्य शासन विविध उपक्रमांची अंमलबजावणी करीत आहे. याअंतर्गत नागरिकांना सुलभ परिवहन सेवा मिळण्यासाठी बाईक टॅक्सीला मंजुरी देण्यात आली आहे. राज्यातील किमान एक लाख लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये आता बाईक टॅक्सी धावणार असून याबाबतच्या धोरणास राज्य मंत्रिमंडळाच्या सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली. रस्त्यावरील वाहनसंख्या कमी होण्यासाठी खासगी दुचाकी वाहनांसाठी बाईक पुलिंगच्या पर्यायालासुद्धा शासनाने मान्यता दिली आहे. अशा वाहनांना मोटार वाहन कायद्यांतर्गत योग्यता प्रमाणपत्र, विधीग्राह्य परवाना व विमा संरक्षण बंधनकारक असणार आहे. बाईक टॅक्सीच्या प्रवासी भाड्याचे दर हे संबंधित प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाद्वारे निश्चित करण्यात येतील.


बाईक टॅक्सीमुळे कमी खर्चात प्रवासासाठी सुलभ पर्याय उपलब्ध होणार आहे. यामध्ये प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य राहणार आहे. या धोरणातंर्गत केवळ परिवहन संवगार्तील इलेक्ट्रीक बाईक टॅक्सीच धावणार आहेत. या योजनेमुळे नागरिकांना स्वस्त प्रवासाच्या पर्यायासह 'लास्ट माईल कनेक्टिव्हीटी' चा पर्याय उपलब्ध होणार आहे. यामुळे शहरातील प्रदूषण व वाहतूक कोंडी कमी होऊन प्रवासाचा वेळ कमी होण्यास मदत होणार असून नवीन रोजगार निर्मिती होण्यास मदत होणार आहे. केवळ २० ते ५० वर्ष वयोगटातील चालकांनाच बाईक टॅक्सी सेवा देता येणार आहे. तसेच यामध्ये महिला प्रवाशांना महिला चालकाचा पर्याय निवडण्याची सोय उपलब्ध असणार आहे.


**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण




**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)



**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
फोन: 9552619752
कॉल/व्हॉटस्ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) सेनापतीस या नावाने संबोधत असत २) आश्चर्य ३) वृक्षाचे पर्ण ४) एक म्हण - *** तोंडी मोठा घास ५) अवघड (इंग्रजीत) ६) नो च्या विरूध्दार्थी इंग्रजी शब्द ७) एक जुना खेळ - ** पारंब्या ८) देव १३) चोहोबाजूंनी पाणी असलेला भूभाग
१४) धनुष्यबाण १५) सीतापती १९) बुडत्याला काडीचा ***
२०) भारताचे सध्याचे राष्ट्रपती
२१) डोकेदुखीवरील मलम २२) ढगांचा होणारा आवाज २१) शेत परिसर २४) प. महाराष्ट्रातील क्रांतीकारी जिल्हा २६) चित्रपटसृष्टीत दिला जाणारा एक पुरस्कार - ***** फाळके २९) अजय देवगणचा एक चित्रपट ३०) किल्ला ३१) खा. सुप्रिया सुळे यांचा मतदारसंघ
३३) श्रीरामाने चौदा वर्षे भोगला तो
३५) वडाभोवती बसण्याचा बांधीव कट्टा ३७) निकड, आवश्यकता ४०) विषमच्या विरूध्दार्थी
४१) गवताचे ओझे ४३) कासवाची आणि याची गोष्ट प्रसिध्द आहे ४४) धातूचा तंतू.

**आडवे शब्द :** १) राजस्थानचे युवा नेते
५) छ. संभाजीराजांच्या पत्नीचे नाव ९) एक (इंग्रजीत)
१०) अर्धा (इंग्रजीत) ११) शिक्षकांना या नावाने संबोधतात, फटाक्यांची माळ
१२) विविध क्षेत्रात अदभूत कार्य करणाऱ्या व्यक्तीस दिले जाणारे आंतरराष्ट्रीय पारितोषिक १४) दोन नंतरची संख्या १६) आई (इंग्रजीत)
१७) कपाळावर येणारा केसांचा झुपका, परंतु (इंग्रजीत) १८) बे दुणे १९) आंब्याची बाग २२) रवा २४) एखाद्यास वश करण्याचे उपाय- ** ** दंड भेद
२५) मोहरा चित्रपटातील अभिनेत्री २६) दानशूर
२७) मुंबईलगतचा एक जिल्हा २८) जुन्या रामायण सिरिजमध्ये हनुमानाची भूमिका करणारा अभिनेता
३१) पत्नी, सहचारिणी ३२) खेळाची पाळी ३४) केळांचा घस ३५) तापमान दर्शविण्यासाठी तापमापकामध्ये हा वापरतात ३६) १००० कि.ग्रॅ. म्हणजे एक **
३७) उष्ण ३८) पाच दुणे ३९) एसटीची प्रवासी गाडी ४१) थंड ४२) पंधरा दुणे
४४) साठ मिनिटांचा वेळ म्हणजे एक **
४५) राजांना या नावाने संबोधतात
४६) कर्जाऊ पैसे देणारा.

## सुडोकु - 215

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | | | | | | 9 | 6 | |
| 7 | | 3 | 4 | | | | | 5 |
| | 2 | | | | 1 | | | 4 |
| | | | 8 | 3 | | 4 | | 6 |
| | 9 | 6 | | | | | 1 | |
| | | 4 | 1 | | 6 | 7 | 5 | 3 |
| | 7 | 2 | 9 | 8 | | 5 | | |
| 8 | | 1 | | | 7 | | 4 | |
| 5 | | | | 1 | 3 | 8 | 2 | 7 |

# एनटीपीसी सोलापूरचे प्रकल्प प्रमुख म्हणून जगदीशचंद्र शास्त्री भामधिपती यांनी पदभार स्वीकारला

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जगदीशचंद्र शास्त्री भामधिपती, कार्यकारी संचालक, एनटीपीसी सोलापूर यांनी 28 मार्च 2025 पासून सोलापूर सुपर थर्मल पॉवर स्टेशनचा प्रकल्प प्रमुख म्हणून कार्यभार स्वीकारला आहे.

जगदीशचंद्र शास्त्री भामधिपती, कार्यकारी संचालक, एनटीपीसी सोलापूर यांनी 28 मार्च 2025 पासून सोलापूर सुपर थर्मल पॉवर स्टेशनचा प्रकल्प प्रमुख म्हणून कार्यभार स्वीकारला आहे. कार्यकारी संचालक या पदावर कार्यरत असलेल्या शास्त्री यांना तीन दशकांहून अधिक उद्योगाचा अनुभव असून, तांत्रिक कौशल्य आणि नेतृत्वगुणांमध्ये त्यांचे मोठे योगदान आहे.

शास्त्री यांनी नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (NIT), कुरुक्षेत्र येथून विद्युत अभियांत्रिकीमध्ये पदवी घेतली आहे (1989). त्यांनी सप्टेंबर 1989 मध्ये NTPC मध्ये आपली व्यावसायिक यात्रा सुरू केली. ते ऊर्जा कार्यक्षमता ब्युरोचे प्रमाणित ऊर्जा लेखापरीक्षक आहेत



आणि त्यांनी मानव संसाधन व्यवस्थापनामध्ये पदव्युत्तर डिप्लोमा देखील संपादन केला आहे.

शास्त्री यांनी यापूर्वी रामागुंडम, एसआर-एचक्यू, सिंगरौली, फरक्का आणि बीआरबीसीएलसह अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांमध्ये विविध विभागांत काम केले आहे.

एनटीपीसी सोलापूरचे कार्यकारी संचालक म्हणून जगदीश चंद्र शास्त्री भामधिपती व्यापक कौशल्य घेऊन आले आहेत आणि त्यांच्या नेतृत्वाखाली एनटीपीसीने उल्लेखनीय प्रगती केली आहे. त्यांचा अनुभव आणि दृष्टीकोन एनटीपीसी सोलापूरच्या विकासासाठी मोलाचा ठरेल.

# अनुसूचित जातीतील आरक्षणाचे उपवर्गीकरण तात्काळ करावे



**नांदेड (कटूसत्य वृत्त):-** सर्वाच्च न्यायालयाच्या आदेश राज्य सरकारने स्वीकारुन अनुसूचित जातीतील उपवर्गिकरण तात्काळ करण्यात यावे. हिमायतनगर तहसीलदार मार्फत शासनाकडे डॉ. अण्णा भाऊ साठे क्रांती सेने च्या वतीने निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

अनुसूचित ५९ जातीतील घटकांना समान न्याय देण्यासाठी उपवर्गिकरणाचा अधिकार राज्य सरकारला असुन त्यांनी करावे असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहे. त्यानुसार माजी न्यायमूर्ती मनोहर बदर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे.

अद्याप या समितीने अनुसूचित जातीतील ५९ जातीच्या सर्वेक्षाणाचे काम सुरू केले नसल्याने हे काम तात्काळ सुरू करून अनुसूचित जातीतील ५९ जातीचे उपवर्गिकरण न्याय देण्यात यावा अशी मागणी डॉ. अण्णा भाऊ साठे क्रांती सेने च्या वतीने हिमायतनगर तहसीलदार मार्फत शासनाकडे 1 एप्रिल रोजी करण्यात आली आहे.

बदर समितीने आताची लोकसंख्या घ्यावी, लहुजी साळवे अभ्यास आयोगाच्या शिफारशी बदर समितीने विचारात घ्याव्या. बदर समितीने तात्काळ सर्वेक्षणाचे काम सुरू करून शासनाकडे अहवाल सादर करावा २० एप्रिल २०२५ पर्यत मागण्यांची अंमलबजावणी नाही झाल्यास २० में २०२५ रोजी मुंबई येथील आझाद मैदानावर तीव्र आंदोलन करण्यात येईल असे निवेदनात म्हटले आहे.

या वेळी जिल्हा सहसचिव संतोष बनसोडे, जिल्हा उपाध्यक्ष संतोष हातवेगळे, तालुका अध्यक्ष संदीप गुंडेकर, पत्रकार दत्ता शिराने, ता.उपाध्यक्ष बालाजी बनसोडे, ता.सचिव विकास मनपूर्वे, शुभम बनसोडे (सदस्य), ता.संघटक सुदर्शन बरकमकर, बालाजी शिराने, श्याम बनसोडे, प्रशांत गुंडेकर, बाबुराव बनसोडे, विशाल बनसोडे, शिवप्रसाद बनसोडे आदी उपस्थित होते.

# 'अभिजात मराठी'साठी लवकरच समिती गठित करणार : मंत्री उदय सामंत



**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** मराठी भाषेला अभिजात मराठी भाषेचा दर्जा प्राप्त झाला असून आता भाषेच्या संशोधन आणि विकासासाठी तसेच भाषेच्या उन्नतीसाठी काम करण्यात येत आहे. यासाठी लवकरच एक समिती गठित करण्यात येईल, असे मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पदभार स्वीकारल्यानंतर प्रत्येक विभागास १०० दिवसांमध्ये करावयाच्या कामांची उद्दिष्टे दिली, त्या अनुषंगाने मराठी भाषा मंत्री सामंत यांच्या अध्यकतेखाली मंत्रालयात आढावा बैठक झाली. बैठकीस मराठी भाषा विभागाचे सहसचिव नामदेव भोसले तसेच विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्री सामंत म्हणाले की, मराठी पुस्तकांना पुरस्कार देण्यात येतो. वाचक हा पुस्तक खरेदी करताना प्रथम पुस्तकाचे मुखपृष्ठ पाहून पुस्तक घेतो. त्यामुळे मराठी पुस्तकांच्या उत्तम मुखपृष्ठासाठी पुरस्कार देण्याबाबत प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

मंत्री सामंत म्हणाले की, मराठी भाषा विभागाच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांचे नूतनीकरण करण्यात येत असून प्रत्येक जिल्ह्यात मराठी भाषा भवन उभारण्याचे काम सुरू आहे. सीमा भागात असलेल्या गावामध्ये मराठी भाषेच्या प्रसारासाठी निधीची तरतूद करण्यात येईल, असे मराठी भाषा मंत्री सामंत यांनी यावेळी सांगितले.

# विजयसिंह मोहिते पाटील कनिष्ठ महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्याची गरुड झेप

**कोंडी, (कटूसत्य वृत्त):-** जाणता राजा बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ कोंडी संचलित विजय सिंह मोहिते पाटील कनिष्ठ महाविद्यालय मध्ये 2020-21 मध्ये शिक्षण घेऊन प्रथम प्राविण्य मिळविलेला वाणिज्य शाखेतील यशस्वी आणि गुणवंत विद्यार्थी सचिन ज्योतीराम काळे याची इंडियन आर्मी मध्ये निवड झाल्यानंतर त्याचा संस्थापक अध्यक्ष गणेश निळ यांच्या हस्ते आणि सर्व शिक्षकांच्या समवेत सत्कार आणि पेढा भरवुन सन्मान करण्यात आला.



यावेळी आपले यशस्वी विद्यार्थ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देताना मार्गदर्शनपर भाषणामध्ये संस्थापक अध्यक्ष गणेश निळ म्हणाले की, "सध्याच्या काळामध्ये प्रत्येक विद्यार्थी स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून तयारी करत असताना देश सेवा करणारी विद्यार्थी घडले पाहिजेत आणि त्या दृष्टीने आमच्या महाविद्यालयामध्ये शिक्षण घेऊन जिद्द आणि चिकाटीच्या बळावर सचिन काळे या विद्यार्थ्याने उंच गरुड झेप घेतल्या असून येणाऱ्या काळामध्ये या विजयसिंह मोहिते पाटील आणि जिजाऊ ज्ञान मंदिर संकुलातून असे अनेक यशस्वी देश सेवा करणारे विद्यार्थी घडवण्याचा आमचा मानस असल्याचे यावेळी बोलताना नीळ यांनी सांगितले.

सत्काराला उत्तर देत असताना सचिन काळे म्हणाला, 'या महाविद्यालयामध्ये मला चांगल्या प्रकारचे मार्गदर्शन मिळाल्यामुळे मला विशेष प्राविण्यसह वाणिज्य शाखेतून 82 टक्के गुण प्राप्त झाले त्यामुळे माझ्या यशामध्ये शिक्षक आणि माझ्या आई-वडिलांचाही सिंहाचा वाटा आहे.

देशाची सेवा करत असताना माझ्या महाविद्यालयाचे आणि गावाचे नाव रोशन करण्यासाठी मी इथून पुढे माझ्या पदाचा उपयोग करणार असल्याचे सचिन ने यावेळी सांगितले.

यावेळी विजयसिंह मोहिते पाटील कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्य सुषमा निळ, संस्थापक अध्यक्ष गणेश नीळ, कोंडी गावचे उपसरपंच शिवाजी नीळ, विकास जाधव, दीपक नीळ, पप्पू पाटील आदि उपस्थित होते.

# टेंभुर्णी येथील शितल ज्वेलर्सचे संजयमामा शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन

**टेंभूर्णी (कटूसत्य वृत्त):-** कोठारी बंधुंनी अतिशय निष्ठेने, जिद्दीने व अथक परिश्रम करून एका दुकानाची तीन अद्ययावत दुकाने केली आहेत. टेंभुणीर्ची सध्या चौफेर प्रगती होत आहे. अशात कोठारी यांची ही सोन्याची दुकाने टेंभुर्णीच्या वैभवात भर घालणारी आहेत, असे प्रतिपादन माजी सभापती विक्रमसिंह शिंदे यांनी केले.





गुरुवारी (दि. २७) टेंभुर्णी येथील शितल ज्वेलर्स या नूतन भव्य शोरूमचे उद्घाटन माजी आमदार संजयमामा शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. प्रास्ताविक विजयकुमार कोठारी यांनी केले. यावेळी शिवसेनेचे संजय कोकाटे, शिवाजी कांबळे, भाजपचे तालुकाध्यक्ष योगेश बोबडे यांनी आपल्या भाषणातून कोठारी बंधुंनी उभारलेल्या शितल ज्वेलर्स या दालनाला शुभेच्छा दिल्या.

प्रारंभी विजयकुमार कोठारी, संजयकुमार कोठारी, राजेंद्रकुमार कोठारी, चेतन कोठारी, शुभम कोठारी, सन्मुख कोठारी, प्रसाद कोठारी यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत केले.

यावेळी खरेदी-विक्री संघाचे चेअरमन तुकाराम ढवळे, रयत क्रांती संघटनेचे अध्यक्ष प्रा. सुहास पाटील, माजी संचालक बाळासाहेब ढवळे, माजी सरपंच प्रमोद कुटे, पोलीस निरीक्षक दीपक पाटील, बँक रिजनल हेड सोलापूर राजीव दुबे, पंढरपूर मर्चेंट बँकेचे चेअरमन शितल तांबोळी, राजूशेठ शेटे, सुधीर तेली, सराफ सुवर्णकार असोसिएशनचे अध्यक्ष शिरीष कटेकर, महावीर गांधी, नागेश भोसले, शिवसेनेचे तालुकाप्रमुख मधुकर देशमुख, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक दिलीप भोसले, रमेश पाटील, उपसरपंच सतीश नेवसे, रोहित देशमुख, दत्तात्रय ढवळे, जयवंत पोळ, संचालक सचिन देशमुख, अॅड. मंगेश देशमुख, संतोष खटके, मार्केट कमिटीचे नागेश खटके-पाटील, औदुंबर महाडिक, गोरख खटके, बेंबळेचे यशवंत भोसले, बलभीम लोंढे, विलास देशमुख, प्रकाश पाटील, डॉ. राहुल पाटील, महेंद्र वाकसे, प्राचार्य महेंद्र कदम, विजय खटके, महेश कोठारी, भीमराव भरगंडे, मनोज काळे, सोमनाथ महाडिक उपस्थित होते.

सूत्रसंचालन राजेंद्र मुळे यांनी केले. आभार राजेंद्रकुमार कोठारी यांनी मानले.

# महायुती सरकारच्या माध्यमातून नागरिकांच्या सुविधांसाठी सर्वाधिक निधी खेचून आणणार - किसन जाधव

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीर्चे प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे, सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघाचे आमदार देवेंद्र कोठे यांच्या सहकार्याने तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव आणि कार्यसम्राट नगरसेवक नागेश गायकवाड यांच्या प्रयत्नातून सोलापूर महानगर पालिकेच्या अंतर्गत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत (सन२०२४-२५) १० लाख ९७ हजार १५६ रुपये खर्चित प्रभाग २२ येथील मातंग समाज स्मशानभूमी ते सोनी नगर कोपरा रस्ता मोदी हुडको काँक्रिटकरण कामाचा शुभारंभ करण्यात आला. प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव, येलगुंडे मावशी, सत्यभामा पवार,सुनंदा



उमाटे, वैशाली डोलारे, योगिता ताई पवार, ज्योतीताई बाबुराव संगेपाग, शकुंतला कोटमाळे, चंद्रमा ओलेकर, सविता ताई बंगले, महालक्ष्मी म्हेत्रे, मुक्ता वागळे, तनुजा पवार, सिद्धम चलवादी, हरीश तेलुगु, राजू पवार,आर्यन साळुंखे, नागेश म्हेत्रे, जगदीश सोनेरीकर, राजाभाऊ अल्कोड, युवराज किसन गायकवाड, सागर किसन गायकवाड, सचिन किसन गायकवाड,वसंत पवार, नागेश ढेंगळे,नारायण धुमाळ मोहन पवार आदींच्या उपस्थितीत या रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचं विधिवत पूजन करून शुभारंभ करण्यात आला. यावेळी बोलताना प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव म्हणाले की महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, मा.खा.सुनील तटकरे साहेब,सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघाचे आमदार देवेंद्र कोठे आणि भाजपा शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांच्या सहकार्याने प्रभाग २२ च्या सर्वांगीण विकासासाठी पाठपुरावा केला होता राष्ट्रवादी पक्ष हा महायुतीमध्ये घटक पक्ष आहे महायुतीतील घटक पक्षांना पालकमंत्री जयकुमार गोरे आमदार देवेंद्र कोठे यांनी आम्हाला सहकार्याचे भूमिका दाखविले यामुळे प्रभागातील नागरिकांना या निमित्ताने मोठा दिलासा मिळणार आहे.

प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी यापुढील काळात महायुतीच्या सरकारच्या माध्यमातून आणखीन भरघोस निधी आणून प्रभागाचा चौफेर विकास होणार आहे. या रस्ता कॉंक्रिटीकरण कामा शुभारंभ प्रसंगी प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी किसन जाधव यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार देवेंद्र कोठे आणि भाजपा शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांचे सहकार्याबद्दल आभार देखील मानले या पुढील काळात देखील ते प्रभाग २२ च्या सर्वांगीण विकासासाठी सहकार्य करतील अशी अपेक्षा देखील त्यांनी व्यक्त केली.

# भीम प्रतिष्ठानचे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर
## विविध क्षेत्रातील 9 जणांचा होणार सन्मान

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भीम प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. शनिवार दि. 5 एप्रिल 2025 रोजी सायंकाळी 6 वाजता हुतात्मा स्मृती मंदिरात पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती संस्थापक बाबा बाबरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



भीम प्रतिष्ठान या संस्थेचे हे रौप्य महोत्सवी वर्ष आहे. प्रतिष्ठानच्या वतीने गेली 25 वर्षात विविध सामाजिक, शैक्षणिक उपक्रम राबविले आहे. विद्यार्थी दत्तक योजनेतून अनेक विद्यार्थी घडले आहेत. दरवर्षी भीम प्रतिष्ठानच्या वतीने विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात येते.

यंदाचा पुरस्कार वितरण समारंभ राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष एड. धर्मपाल मेश्राम यांच्या हस्ते आणि महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस उपायुक्त विजय कबाडे, पोलीस उपायुक्त डॉ. दिपाली काळे, विवेक विचार मंचचे संयोजक सागर शिंदे, जिल्हा परिषदेचे पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाध्यक्ष अमोल शिंदे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. याप्रसंगी उद्योजक पदमचंद राका, राजेंद्र शहा - कासवा, डॉ. शिवाजीराव पवार, डॉ. उदय वैद्य, सुजीत कदम, प्रा. विक्रम कांबळे, दत्ता गायकवाड, देवेंद्र मोरे, धर्मेंद्र माने आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाहीर दीपक कांबळे यांचा भीम गीतांचा कार्यक्रम होणार आहे. यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यक्ष वीरेंद्र हिंगमिरे यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस अकबर शेख, सिद्धांत बाबरे, अॅड. विशाल मस्के, स्वाती मस्के उषा चव्हाण आदी उपस्थित होते.

### हे आहेत यंदाच्या पुरस्काराचे मानकरी

यंदाच्या वर्षी उद्योजक महादेव कोगनुरे (सामाजिक पुरस्कार), संपादक प्रशांत माने (पत्रकारिता पुरस्कार), रवी बापटले (विशेष गौरव पुरस्कार), प्रा. नानासाहेब गव्हाणे (गौरव पुरस्कार), राखी देशमाने (शैक्षणिक), राहुल बनसोडे (कामगार पुरस्कार), उमाकांत गायकवाड ( क्रीडा पुरस्कार), दिगंबर भगरे (सन्मानपत्र), विनोद माने (सन्मानपत्र) आदी मान्यवरांना मान्यवरांना पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. सन्मान चिन्ह, सन्मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

# लोकमंगल कृषी महाविद्यालयात महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी स्थापना दिवस संपन्न




**वडाळा (कटूसत्य वृत्त):-** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा येथे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत दिनांक 29 मार्च रोजी राहुरी विद्यापीठाचा स्थापना दिवस विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. स्थापना दिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी मौजे कौठाळी या गावामध्ये स्वच्छता अभियान राबवून श्रमदान केले. महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे हे लाभले होते. कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. याप्रसंगी प्रास्ताविक मांडताना प्रथम वषार्तील विद्यार्थी दत्तप्रसाद चव्हाण याने राहुरी विद्यापीठ स्थापना, विस्तार आणि कार्यक्षेत्र याबाबत सर्वांना जागृत केले. विद्यार्थी मनोगतामध्ये दिग्विजय विधाते याने आपले विचार मांडले. विद्यार्थ्यांना संबोधित करताना राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. अजित कुरे यांनी देशाच्या तथा महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्रात महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीचा संशोधन क्षेत्रात सिंहाचा वाटा असल्याचे विशेष नमूद केले. अध्यक्षीय मनोगतामध्ये डॉ. अमोल शिंदे यांनी विद्यापीठाच्या कृषी शिक्षण, संशोधन आणि विस्तार या बाबी विस्तृत स्वरूपात समजून सांगितल्या. विद्यापीठातील विविध संशोधन आणि सद्यस्थितीला सुरू असलेले नाविन्यपूर्ण उपक्रम याबाबत त्यांनी विशेष माहिती दिली. विद्यार्थ्यांनी देखील आपल्या शिक्षणाद्वारे दैदीप्यमान यश संपादन करून विद्यापीठ आणि महाविद्यालयाचे नाव कृषी क्षेत्रात उज्वल करावे असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अजित कुरे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन विद्यार्थी प्रतिनिधी दत्तप्रसाद चव्हाण याने केले. सदरील कार्यक्रमास सुजाता चौगुले, नम्रता गोरे, मीनाक्षी नाईकनवरे, सुकन्या जाधव, कल्पना मिटकरी आणि विद्यार्थ्यांची उल्लेखनीय उपस्थिती होती.

# भेसळ दुधाविरुद्ध मोहीम तीव्र : १६ जणांचे पथक
## अन्न व औषध प्रशासनाने विविध ठिकाणातून दुधाचे घेतले २२ नमुने



**सोलापूर (कटुसत्य वृत्त):-** शहर आणि जिल्ह्यात भेसळ दूध माफिया सक्रिय झाले आहेत. या माफियांकडून भेसळयुक्त दुधाची राजरोसपणे विक्री सुरू झाली आहे. अशा भेसळयुक्त दुधाच्या विक्रीच्या विरोधात अन्न व औषध प्रशासनाकडून मोहीम राबवली जात आहे. या मोहिमेत विविध ठिकाणचे २२ दुधाचे नमुने तपासणीसाठी घेतले आहेत.

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांकडून दूध खरेदी करत त्याची शहरात विक्री करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. ग्रामीण भागातील दूध आणणारे शेतकऱ्यांकडून दुधाची भेसळ होणे शक्य नाही. शेतकऱ्यांकडून दूध विकत घेऊन त्यात रासायनिक घटक मिसळून भेसळयुक्त दूध तयार केले जाते. ते पाकीटबंदही करण्यात येते. त्या पाकिटावर उत्पादकाचे नाव किंवा दुधातील घटकाची नोंदही नसते. अशाच दुधाची सर्वत्र विक्रीही बिनबोभाट सुरू आहे. ती रोखण्याची मागणी नागरिकांमधून केली जात होती.

भेसळ दुधाच्या विरोधातील कारवाईची मोहीम अन्न व औषध प्रशासनाने तीव्र केली आहे. सध्या जिल्ह्यात १६ अधिकाऱ्यांचे पथक या विरोधात काम करत आहेत. या पथकाकडून दूध संकलन केंद्र, विक्री केंद्र आणि वाहतूक करणारे अशा विविध ठिकाणावरून २२ दुधाचे नमुने घेतले आहेत. हे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविले आहेत. प्रयोगशाळेतील तपासणी अहवाल काय येईल, त्यानुसार कारवाई होण्याची शक्यता आहे. दुधातील भेसळ माफियांवर जरब बसण्यासाठी दंडात्मक कारवाईची गरज आहे.

दूध संकलन केंद्रासह अन्य ठिकाणचे २२ दुधाचे नमुने तपासणीसाठी घेतले आहेत. दुधाचा दर्जा आणि त्यात झालेल्या भेसळसह अन्य घटकाच्या तपासण्यासाठी ते प्रयोगशाळेत पाठवले आहेत. अहवाल आल्यास त्यानुसार कारवाई करण्यात येईल.

**- सुनील जिंतुरकर,**
सहाय्यक आयुक्त, अन्न औषध प्रशासन

# महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे अकलूज येथे आयोजन करावे : खा. धैर्यशील मोहिते-पाटील

**अकलूज : (कटुसत्य वृत्त):-** महाराष्ट्र केसरी २०२६ पुरुष आणि महिलांच्या या दोन्ही स्पर्धांचे अकलूज येथे आयोजन करावे, अशा मागणीचे पत्र खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष शरद पवार यांना दिले.

पत्रात म्हटले आहे की, सन १९७६ मध्ये सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांनी अकलूज येथे महाराष्ट्र कुस्ती स्पधेर्चे आयोजन केले होते. या घटनेस २०२६ साली पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत. हा सुवर्ण महोत्सवी क्षण अकलूजकरांसाठी अभिमानाची बाब आहे. या ऐतिहासिक क्षणानिमित्ताने महाराष्ट्र केसरी पुरुष व महिला या दोन्ही स्पर्धा अकलूज येथे घेण्याचा प्रस्ताव आम्ही या निमित्ताने आपणास देत आहोत.

अकलूज हे कुस्ती परंपरेतील एक महत्त्वाचे केंद्र असून येथे भव्य मैदान, उत्कृष्ट सुविधा व कुस्ती शौकिनांच मोठा प्रतिसाद आहे. याचा विचार करून आपण अकलूज येथे कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्याची मान्यता द्यावी, अशा प्रकारची विनंती पत्रातून खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी शरद पवार यांच्याकडे केली आहे.

